महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारित ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: ३४, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४ ते सोमवार २५ नोव्हेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

## संक्षिप्त

### ठाणे हे खोक्याचे केंद्र - उद्धव ठाकरे

■ ठाणे/ कल्याण/ दिवा: तृप्ती गोरे

ठाणे हे खोक्याचे केंद्रबिंदू आहे. या केंद्रबिंदूच्या बुडाला मशालीने आग लावली तर संपूर्ण राज्य गद्दारमुक्त होईल, अशी टीका करत गद्दारांना क्षमा नाही, हे आनंद दिघे यांचे संस्कार विसरू नका, असे आवाहन शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी ठाण्यातील सभेत बोलताना केले. तसेच मागच्या वेळी बिनशर्ट पाठिंबा देणाऱ्यांनी यंदा इनशर्ट पाठिंबा दिल्याचे सांगत मनसेची गुजसे



म्हणजेच गुजरात नवनिर्माण सेना झाली आहे, असा टोला त्यांनी राज ठाकरे यांना अप्रत्यक्षपणे लगावला. शिवसेना (ठाकरे गट) ठाणे शहर उमेदवार राजन विचारे, कोपरी- पाचपाखडीचे उमेदवार केदार दिघे, ओवळा-माजीवडाचे उमेदवार नरेश मनेरा, कल्याण ग्रामीणचे उमेदवार सुभाष भोईर, डोंबिवलीचे उमेदवार दीपेश म्हात्रे, कल्याण पूर्वचे उमेदवार धनंजय बोडारे यांच्या प्रचारासाठी शिवसेना (ठाकरे गट) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी ठाणे, डोंबिवली आणि कल्याण येथे जाहीर सभा घेतल्या. मुंबई महापालिकेत त्यांच्या कंत्राटदार मित्राला पाऊल ठेवू दिले नाही म्हणून त्यांनी माझे सरकार पाडले, असा दावा करत 'केलंय काम भारी, लुटली तिजोरी, आता पुढची तयारी,' अशी टीका त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेच्या जाहिरातबाजीवरून केली.

### लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल अमेरिकेत ताब्यात

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोईला अमेरिकेत ताब्यात घेण्यात आले आहे. अनमोल अमेरिकेत असल्याची माहिती भारतीय यंत्रणांना मिळाल्यानंतर त्याला पकडण्यासाठी मुंबई पोलिसांनी अनमोल



बिश्नोईच्या प्रत्यार्पणासाठी प्रस्ताव पाठवला होता. अनमोलला कॅलिफोनिऱ्यामध्ये ताब्यात घेण्यात आले आहे. सलमान खानच्या घराबाहेरील गोळीबार प्रकरण आणि बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात अनमोल बिश्नोई सहभागी आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अलिकडेच अनमोल बिश्नोईची माहिती देणाऱ्याला १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. एनआयएने अनमोल बिश्नोईविरुद्ध २०२२ मध्ये नोंदवलेल्या दोन प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले आहे. गेल्या महिन्यात, मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने विशेष मोक्का न्यायालयात अनमोलला भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली होती.

# विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोग पथकांची जबरदस्त कामगिरी

## आचारसंहिता भंगाच्या ८,६६८ तक्रारी निकाली, ६६० कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

■ मुंबई : विशाल कारंडे

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत यंदा निवडणूक आयोगाच्या पथकाने मोठी कामगिरी केली आहे. निवडणूक जाहीर झाल्यापासून बेकायदेशीर रक्कम, सोने, चांदी, दारु आणि अंमलीपदार्थ जप्तीची धडक कारवाई केली आहे.**

या कारवाईत आतापर्यंत एकूण ६६० कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. सोमवारी विधानसभा निवडणुकीचा प्रचार तोफा थंड झाल्या. परंतु त्यानंतर दोन दिवस निवडणूक आयोगाचे पथके आणि पोलीस प्रशासन अधिकच सतर्क असणार आहे. राज्यात २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होत आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ६६० कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.




राज्यभर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. सोमवारी नाशिकच्या एका नामांकित हॉटेलमध्ये कोट्यवधी रुपये सापडले आहे. त्या रुपयांची मोजणी निवडणूक पथकाकडून करण्यात येत होती. ही रक्कम पाच कोटीहून अधिक रक्कम असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्या ठिकाणी राजकीय पक्षाच्या नेत्याची गाडी जप्त करण्यात आली. दोन दिवसांपूर्वी मुंबईत ८० कोटींची चांदी जप्त करण्यात आली होती. त्यानंतर जळगाव आणि नागपूरमध्ये सोने, चांदीचे दागिने जप्त केले होते. हे दागिने सराफ व्यावसायिकांचे होते. परंतु त्यासंदर्भातील कागदपत्रे नसल्यामुळे ते जप्त केले होते. निवडणूक आयोगाने आचारसंहिता भंगच्या तक्रारीवर कारवाई केली आहे. १५ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी-व्हिजिल (ए-न्नुग्त) ॲपवर एकूण ८ हजार ६७८ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ८ हजार ६६८ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. सी-व्हिजिल ॲपद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उलंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे ॲप कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

## ६५ वर्षे जुना खासदार अपात्रता कायद्याच्या जागी नवीन कायदा आणण्याची केंद्राची योजना

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

लाभाचे पद धारण करण्यासाठी खासदारांना अपात्र ठरवणारा ६५ वर्ष जुना कायदा रद्द करण्याचा केंद्र सरकारचा विचार आहे. सरकार एक नवीन कायदा आणण्याचा विचार करत आहे, जो सध्याच्या गरजांशी सुसंगत असेल. कलराज मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील नफ्याच्या कार्यालयावरील संयुक्त समितीने (ण्इ्थ) केलेल्या शिफारशींच्या आधारे तयार करण्यात आलेल्या संसद विधेयक, २०२४ 'चा मसुदा केंद्रीय कायदा मंत्रालयाच्या



विधिमंडळ विभागाने सादर केला आहे. विद्यमान संसद (अपात्रता प्रतिबंध) कायदा, १९५९ च्या कलम ३ चे तर्कसंगतीकरण करणे आणि अनुसूचीमध्ये दिलेल्या पदांची नकारात्मक यादी काढून टाकणे, ज्याच्या धारणेमुळे लोकप्रतिनिधी अपात्र ठरू शकतात, हे प्रस्तावित विधेयकाचे उद्दिष्ट आहे. विद्यमान कायदा आणि इतर काही कायद्यांमधला संघर्ष दूर करण्याचाही प्रस्ताव आहे ज्यात अपात्रतेची स्पष्ट तरतूद आहे. विधेयकाच्या मसुद्यामध्ये काही प्रकरणांमध्ये अपात्रतेच्या 'तात्पुरत्या निलंबना'शी संबंधित विद्यमान कायद्यातील कलम ४ हटवण्याचाही प्रस्ताव आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## मतदानासाठी मतदार ओळखपत्र नसल्यास 'हे' १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य

■ पुणे : अभिजीत येरल्लू

मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्र जवळ नसल्यास अन्य १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी असल्याचेही ते म्हणाले. पुणे जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीअंतर्गत २० नोव्हेंबर रोजी २१ मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी ही माहिती दिली आहे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र आहे अशा मतदारांनी मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करावे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत अशा मतदारांची ओळख



पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र जॉब कार्ड, बँक किंवा टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्र असलेले पासबुक, (शेष पृष्ठ २ वर)

## ई ऑफिस प्रणालीअंतर्गत म्हाडाचा कारभार लवकरच होणार कागदविरहीत

■ मुंबई : राकेश गायकवाड

म्हाडाचा संपूर्ण कारभार संगणकीय, कागदविरहित (पेपरलेस) करण्याचा निर्णय यापूर्वीच म्हाडाने घेतला होता. आता या निर्णयाच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात येणार आहे. त्यानुसार ई ऑफिस प्रणालीअंतर्गत म्हाडातील सर्व सेवांचे लवकरच संगणकीकरण केले जाणार आहे. टप्प्याटप्प्याने हे संगणकीकरण केले जाणार असून पहिल्या टप्प्यात जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास प्रस्तावास मुदतवाढ देण्याची वा 'ना हरकत' प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया संगणकीय पद्धतीने राबविली जाणार आहे. तर मुंबई मंडळातील भूखंडांच्या भाडेपट्टा करारनाम्यांचे नूतनीकरण संगणकीय पद्धतीने केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यातील सेवांचे संगणकीकरण करण्याच्या कामाला लवकरच म्हाडाच्या संबंधित विभागाकडून सुरुवात केली जाणार आहे. एकूणच




या संगणकीकरणामुळे लवकरच म्हाडाचा कारभार कागदविरहीत होणार आहे. म्हाडाकडून गृहप्रकल्प राबविण्यासह सोडतीद्वारे सर्वसामान्यांना घरांचे वितरण केले जाते. तर जुन्या इमारतींचा, म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास केला जातो. तर इतर अनेक सेवा पुरविल्या जातात. या सर्व कामांसाठी म्हाडा लाभार्थ्यांसह इतर नागरिकांना म्हाडा भवनासह राज्यभरातील विविध विभागीय मंडळामध्ये यावे लागते. काळानुरूप कारभार संगणकीय करण्याचा निर्णय यापूर्वीच म्हाडाने घेतला होता. त्यानुसार आधी सोडतपूर्व आणि सोडत प्रक्रिया संगणकीय करण्यात आली, तर दीड वर्षापूर्वीच सोडतीनंतरची संपूर्ण प्रक्रियाही संगणकीय करण्यात आली आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## संविधान बदलण्याची कुणाची हिंमत नाही: केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

■ ठाणे : आकाश कांबळे

आणीबाणीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची ऐसीतैशी करणारे आता संविधान बचावासाठी गावभर फिरत असल्याचे सांगत संविधान आम्ही बदलणार नाही, कुणाला बदलू देणार नाही आणि कुणाची बदलण्याची हिंमत नाही, असे केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी ठाण्यातील जाहीर सभेत बोलताना सांगितले. आपण चांगल्या उपहारगृहात चवीसाठी तर शस्त्रक्रियेसाठी चांगल्या डॉक्टरांकडे जातो, त्यावेळी आपण जात पाहत



नाही, मग निवडणूकीत आपण जात का बघतो, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. ठाणे शहरातील भाजपचे उमेदवार संजय केळकर यांच्या प्रचारासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी सायंकाळी ठाण्यात जाहीर सभा घेतली. या सभेत गडकरी यांनी काँग्रेसवर टीका केली. लोकसभा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर जातीवादाचे आणि सांप्रदायिकतेचे विष कालवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बदलणार असा अप्रचार करण्यात आला. आम्हाला ४०० जागा मिळाल्या तर आम्ही संविधान बदलू असा प्रचार करण्यात आला. परंतु आम्ही संविधान बदलणार नाही, बदलू देणार नाही आणि कोणाची बदलण्याची हिंमत नाही, असेही ते म्हणाले.

(शेष पृष्ठ २ वर)

## निवडणूक आयोगाची मोठी कारवाई; ३३ शाळांच्या मुख्याध्यापकांचे निलंबन करण्याचे आदेश

■ छ. संभाजीनगर : विशाल कारंडे

जिल्ह्यातील ३३ खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांवर शिक्षण विभागाने गुन्हे दाखल केले. आता त्या मुख्याध्यापकांना निलंबित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील ९२ शाळांनी आपल्या कर्मचाऱ्यांची माहिती निवडणूक विभागाला सादर केली नव्हती. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी त्या शाळांच्या मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार आतापर्यंत ३३ शाळांच्या मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल झाले. यात प्राथमिक




१७ आणि माध्यमिकच्या १६ शाळांचा समावेश आहे. उर्वरित विनाअनुदानित शाळांची माहिती चुकून डेटामध्ये आल्याची माहिती शिक्षण विभागाने जिल्हा प्रशासनाला दिली. विधानसभा निवडणूक कामकाजासाठी खूप कर्मचारी लागतात. त्यामुळे विविध सरकारी कार्यालये, अनुदानित खासगी शाळा, अनुदानित खासगी महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवा निवडणूक विभागाकडे वर्ग करण्यात येतात. त्यानुसार विभागांकडून शैक्षणिक संस्थेतील कर्मचाऱ्यांची माहिती मागविली होती. परंतु, ती माहिती प्रशासनाला ३३ शाळांकडून मिळाली नाही. निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांची माहिती न देणाऱ्या सर्व शाळा खासगी आहेत.


## निवडणुकीत उमेदवारांकडून डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर; सोशल मीडियाद्वारे हायटेक प्रचार

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

विधानसभा निवडणुकीत प्रचारात बदलत्या तंत्रज्ञानानुसार डिजिटलचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. ग्रामीण भागात सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचाराची स्मार्ट पद्धत अवलंबली जात आहे. सध्या जिल्ह्यात उमेदवारांकडून फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, यु-ट्युब, ट्विटरच्या माध्यमातून हायटेक प्रचाराची यंत्रणा प्रभावीपणे राबविली जात आहे. वीस-पंचवीस वर्षापूर्वी निवडणूकांचा प्रचार करताना उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना मतदारापर्यंत प्रत्यक्ष पोचण्याव्यतिरिक्त इतर पर्याय नव्हता. त्यावेळी जाहीर सभा, घोंगडी बैठकांवर आणि नात्यागोत्यांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोचण्याचा उमेदवारांचा आटापिटा चाललेला असायचा. संपर्क यंत्रणेच्या अभावी कानाकोपऱ्यात गावोगावी जाताना सर्वांचीच दमछाक व्हायची. त्या काळात बैलगाडी, दुचाकी, टेम्पो, जीप, ट्रक अशा वाहनांमधून गावोगांवी जात कर्ण्याच्या स्पीकरवरून घोषणा देत, गाणी म्हणत आणि पथनाट्याच्या माध्यमातून प्रचार केला जात होता. गावोगावी घरांच्या भिंतीवर उमेदवाराचे नाव आणि चिन्ह रंगविले जायचे. बिल्ले, झेंडे अशा प्रकारच्या प्रचार साहित्यांचा घराघरांत वापर केला जात होता. सध्याच्या काळात सोशल मीडियाचा



वापर निवडणूक प्रचारासाठी वाढला आहे. दरम्यान, सोशल मीडियावरून आरोप, प्रत्यारोप गाजत आहेत. वेगवेगळ्या आकर्षक सजावटींचे बॅनर, व्हिडिओ या माध्यमातून मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न चालू आहे. एकंदर नेटकऱ्यांच्या माध्यमातून आधुनिक स्वरूपाचा स्मार्ट प्रचार उमदेवारांकडून सुरू आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, यु-ट्युब, ट्विटर या ऑनलाइन यंत्रणेमुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात घडलेली घटना काही मिनिटात लोकांना कळू लागली. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे प्रचाराचे प्रभावी साधन ठरले आहे. पक्षांची, उमेदवारांच्या प्रगतीची, घेतलेल्या निर्णयाची सचित्र माहिती देणाऱ्या डिजिटल स्क्रीन गावोगावी धावत आहे. निरनिराळी स्लोगन वापरून भविष्याचे व्हीजन स्क्रीनवर दाखवून मतदारांना प्रभावित केले जात आहे.




# सर्वांचे सर्वांसाठी सारे काही!

महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुती हे दोन प्रमुख स्पर्धक, इतर आघाड्या आणि पक्ष तसेच अनेक अपक्ष अशा साऱ्यांचे जाहीरनामे, वचननामे, महाराष्ट्रनामे, संकल्पपत्रे... जाहीर झाले आहेत. त्यातील सगळी कलमे पाहिली तर महाराष्ट्राचे नंदनवन होणे ही २३ तारखेला होणाऱ्या मतदानापुरती औपचारिकताच उरली आहे, असा समज होईल. म्हणजे, मतदारांनी केवळ बोटाला काळी शाई लावून घेतली की महाराष्ट्राची जी घोडदौड सुरू होणार आहे ती महाराष्ट्र जगात अग्रगण्य बनेतो चालू राहणार आहे.

आता फक्त 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'चा जाहीरनामा बाकी आहे. मागे त्यांनी 'वचकनामा' काढला होता. राज ठाकरे यांनी विकासाची ब्लू प्रिंट मागेच तयार केली असल्याने मनसेकडे कदाचित नव्याने सांगण्यासारखे काही नसेलही. 'एकदा महाराष्ट्र माझ्या ताब्यात द्या; सगळ्यांना सुतासारखे सरळ करतो...' हाच खरेतर मनसेचा जाहीरनामा आहे. बाकीच्या पक्षांना ही अल्पाक्षरी मौज झेपण्यासारखी नाही. त्यामुळे, एके काळी धरणातली पाणीपातळी वाढविण्यासाठी नामी शक्कल शोधणाऱ्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवार असलेल्या प्रत्येक मतदारसंघासाठी स्वतंत्र जाहीरनामा काढला आहे. खरे तर, बारामती मतदारसंघात आता पवारांकडून प्रत्येक घरावर सोन्याची कौले तेवढी घालायची राहिली असतील. तरीही, बऱ्याच राहिलेल्या कामांचा उल्लेख बारामतीच्या जाहीरनाम्यात आहे. मात्र, गेल्या पाच वर्षांत बारामतीत नऊ हजार कोटी रूपयांची कामे झाली असतील तर उरलेल्या २८७ मतदारसंघांच्या नशिबी हे भाग्य कधी येणार, हा खरा प्रश्न आहे. प्रत्येक मतदारसंघाची अशी बारामती करायची तर पूर्ण भारताचा अर्थसंकल्पही अपुरा पडेल. कारण त्यासाठी मग दर पाच वर्षांनी निदान २५ लाख कोटी रुपये लागतील. या हिशेबाने महाराष्ट्राची 'जिवाची बारामती' कशी व कधी होणार?

भाजपप्रणित महायुती आणि काँग्रेसप्रणित महाविकास आघाडी हे जणू एकमेकांवर दबा धरून बसले होते. त्यामुळे, दोघांच्याही जाहीरनाम्यांमध्ये आश्वासनांचा इतका पाऊस आहे की शेकडो गावांतली ओस आरोग्य केंद्रे, छळछावण्या आश्रमशाळा, माओवाद्यांनी जाळलेल्या सरकारी इमारती, शेकडो शेतकऱ्यांच्या आत्महत्या, झोपड्यांनी वेढलेली शहरे, पाण्याचे हजारो टँकर... हे सारे कोणत्या परग्रहावरचे वर्णन आहे, असे कुणाला वाटेल. 'तुम्ही आश्वासनांच्या लंब्याचवड्या गप्पा मारण्यापेक्षा आज ज्या आहेत, त्या सेवा नीट, नेकीने कधी चालवणार आहात?' असे राजकीय पक्षांना व उमेदवारांना स्पष्टपणे खडसावून विचारण्याइतके महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातले मतदार सुजाण झाले आहेत का? काँग्रेसचे अनेक नेते 'रेवडी संस्कृती' आणल्याबद्दल विरोधकांवर टीका करीत होते. ती योग्य होती. मग महाविकास आघाडीला समाजातल्या सर्व वर्गांवर सवलतींचा वर्षाव करण्याची आणि मोफतबाजीचा कळस गाठण्याची इतकी घाई कशासाठी? राज्यात स्वस्त धान्य योजना (रेशन) अनेक दशके चालू आहे. ती प्रामाणिकपणे व पारदर्शकपणे चालविली तर कनिष्ठ मध्यमवर्ग तसेच गरिबांना रास्त



भावात जीवनावश्यक वस्तू मिळू शकतात. पण ही योजना नीट चालवायची नाही, तीत प्रचंड भ्रष्टाचार चालू ठेवायचा आणि जाहीरनाम्यात मात्र 'जीवनावश्यक पाच वस्तूंचे भाव पाच वर्षे स्थिर ठेवू...' अशा बाता मारायच्या, याला काय अर्थ आहे?

'कल्याणकारी राज्य' संकल्पनेचा शोध जगात प्रथम आपणच लावला, अशा थाटात सत्ताधारी व विरोधकांनी भरमसाट आश्वासनांची खैरात केली आहे. विशेष म्हणजे, दोन्हींकडे कित्येक आश्वासने समानच आहेत. 'तुम्ही दोघेही तेच काम करणार, धरणे गाळमुक्त करणार, ऊसशेती ठिबक करणार, शहरांत विजेची वाहने आणणार, पर्यावरणाचे रक्षण करणार, महाराष्ट्र उद्योगात पहिल्या क्रमांकावर नेणार, सर्व वृद्धांना पेन्शन देणार...' मग हे आले काय किंवा ते आले काय, नेमका फरक काय पडतो? हे जाहीरनामे इतके 'सर्वसमावेशक, सर्वस्पर्शी' होण्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे आजवर एकाही सरकारने नगर नियोजन, शहरी पाणीपुरवठा, जलसंधारण, वाहतूक, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, प्रदूषणमुक्ती... याबाबत मूलभूत आणि सर्व समाजाला पुरेसा दिलासा देणारे कामच केलेले नाही. ते केलेले नसल्याने जाहीरनाम्यांमध्ये सगळ्या वचनांची 'वरची पट्टी' लागली आहे.

प्रचाराच्या शेवटच्या आठवड्यात मतदारांना नेमके कसे खूष करायचे किंवा भावनांच्या कोणत्या लाटांवर स्वार करायचे; याचे निराळेच हिशेब सध्या चालू असतील. त्यामुळे, सगळ्यांचे छापील जाहीरनामे आणि वचननामे म्हणजे राज्यातल्या भेळ व्यवसायाला दिलेले सक्रिय प्रोत्साहन आहे. तसे नसते तर एक तरी नेता यातल्या लाखो शाळाबाह्य मुले किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या उल्लेखांबद्दल तळमळीने बोलला असता. हे व इतर विषय मतदारांना समजावून देऊ शकला असता. पण असे सगळे उल्लेख निव्वळ शोभेचे असतात. सर्वांना सारे काही देणारे हे जाहीरनामे हा सत्याचा अनोखा प्रयोग म्हणून इतिहासात अजरामर होईल!


---

**मराठी व्याकरणात कर्ता, कर्म आणि क्रियापदांना महत्त्व असतं. यात कर्ता दिशादर्शक मानला जातो. वाक्यातील क्रियापदाने दर्शवलेली क्रिया करणारा शब्द म्हणून त्याची ओळख असते. त्यानंतर येते ते कर्म, ज्यावर क्रिया घडते त्याला कर्म म्हटले जाते आणि वाक्यातील मुख्य शब्द हे क्रियापद मानले जाते. या क्रियापदाशिवाय वाक्याचा अर्थबोध पूर्ण होत नाही.**

त्यामुळे भाषेच्या व्याकरणात या तीनही संज्ञा अत्यंत महत्त्वाच्या प्राथमिक आणि पर्याय नसलेल्या असतात. वाक्याचा अर्थबोध झाल्यावर भाषेचा संवाद पूर्ण होतो. त्यानंतर या संज्ञाचे काम संपुष्टात येते. व्याकरणात आणि राजकारणातही कर्त्याची कर्तव्ये सारखीच असतात. व्याकरणात कर्ता, कर्म आणि क्रियापद हे तीन गुण असलेले वाक्य परिपूर्ण मानले जाते, तर राजकारणात हे तीनही गुण असलेला कार्यकर्ता परिपूर्ण मानला जातो. व्याकरणात आणि राजकारणात हे साम्य कमालीचे आश्चर्यकारक आहे. व्याकरणातल्या कर्त्याचा राजकारणात कार्यकर्ता होतो. कार्यकर्त्यासाठी त्याचा नेता कर्ताधर्ता असल्याने केवळ त्याने आदेश दिलेले कर्म करत राहणे आणि त्यानुसार पुढील क्रिया चालवली जाणे महत्त्वाचे असते. पक्षात याला निष्ठा असे नाव असते. राजकारणात नेत्यांच्या निष्ठा बदलत असतात, मात्र कार्यकर्त्यांनी आपल्या निष्ठा नेत्यांच्या निष्ठेनुसार वेळोवेळी वळवायच्या असतात, स्वतंत्रपणे विचार करणे कार्यकर्त्यासाठी पक्षद्रोह मानला जातो, परंतु नेत्यांनी आपल्या धोरणात बदल केल्यास त्याला मुत्सद्दीपणा मानलं जातं.

महाराष्ट्राच्या राजकारणात सद्यस्थितीत सर्वच पक्षांनी त्यांच्या मूळ ध्येय धोरणांशी फारकत घेतली आहे. एकसंध शिवसेनेनंतर आताचे दोन्ही गट, काँग्रेस, राष्ट्रवादी, मनसे अशा सगळ्याच पक्षांच्या ध्येय धोरणांत पक्षनेत्यांनी काळानुसार बदल केले आहेत, मात्र या पक्षातील कार्यकर्त्यांची निष्ठा कायम आहे. व्याकरणातले कर्ता, कर्म आणि क्रिया असे तीनही गुण कार्यकर्त्यात असणे गरजेचे असते. भाषेतील संवाद पूर्ण झाल्यावर व्याकरणातल्या वाक्याची गरज संपते, तसेच सत्ता आल्यावर राजकारणातल्या कार्यर्त्याची गरजही संपुष्टात येते. राजकारणात दोन प्रकारचे कार्यकर्ते असतात. केवळ आपले हितसंबंध जोपासण्यासाठी राजकारणात आलेले आणि निष्ठा, विचार, ध्येय धोरणांमुळे पक्षासाठी काम करणारेष्ठयात पहिल्या प्रकारच्या कार्यकर्त्यांचे यथावकाश नेत्यांमध्ये रूपांतर होते तर दुसऱ्या प्रकारच्या कार्यकर्त्यांना निष्ठेच्या नावाखाली तडजोड क्रमप्राप्त असते. कार्यकर्त्यांना लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या

## गरीब बिचारे कार्यकर्ते



पक्षाने केलेले राजकारण ही चळवळ वाटत असते. पक्षाला ध्येय धोरणे असल्याचे कार्यकर्त्याला कायम ठामपणे सांगितले जाते. त्यासाठी अस्मिता, इतिहास, परंपरा, संस्कृती, निष्ठा असे काहीबाही शब्दांचे दाखले दिले जातात.

कार्यकर्त्यांना या सगळ्याचा अभिमान असतो. बरेचदा आपल्या दुचाकीवर हा अभिमान स्टीकर पट्ट्यांनी लिहून मिरवला जातो. निवडणुकांच्या काळात कार्यकर्त्याचं कार्य हे त्याचं दक्ष कर्तव्य बनलेलं असतं. या कर्तव्यापुढे इतर सगळ्याच कर्तव्यांना किंमत नसते, तशी कार्यर्त्यांनाही किंमत नसते. निवडणुकीत किंमत मतदारांना असते. त्यामुळे अशी किंमत मतदारांपर्यंत पोहचवण्याच्या प्रयत्नात कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल होतात. कार्यकर्त्यांनी असे गुन्हे पक्षासाठी काम केल्याची पोचपावती म्हणून अभिमानाने मिरवायची असते.

राजकारणात नेत्यांची फळी असते, तर ही फळी ज्या पायावर उभी असते त्या पायाशी कार्यकर्ता असतो. राजकारणाचा फळीदार डोलारा कार्यकर्त्यावरच उभा असतो. त्यामुळे हा कार्यकर्ता दर्शनी स्टेजवर दिसत नाही, तो स्टेजच्या मागे किंवा बरेचदा खालीच असतो. पक्षाच्या मंचावर मान्यवर नावाची माणसे असतात. त्यांचा पोडीयम उचलणे, माईक सेट करणे, नेते-पदाधिकाऱ्यांच्या नाष्टा जेवणाची सोय करण्याची महत्त्वाची कामे कार्यकर्त्यांना करावी लागतात. रिकाम्या खुर्च्यांवर बसण्यासाठी माणसे मागवणे, आपल्या लोकप्रतिनिधीची ताकद पक्षनेतृत्वाला दाखवण्याची बहुमोल जबाबदारी कार्यकर्त्यांवर असते. अशा कार्यकर्त्याला सतरंजी उचलण्यापुरते संबोधून त्यांचा अवमान विरोधी गटाकडून केला जातो, त्यावेळी स्थानिक नेत्यांकडून पक्षनेतृत्वाचे जोडेही उचलले गेल्याचे पाहून सतरंजी उचलणाऱ्या कार्यकर्त्यांना सुखद दिलासा मिळालेला असतो. कार्यकर्त्यांनी मागणी करायची नसते. मागणी करण्याला पक्षद्रोह, गद्दारी किंवा बंडखोरीचे नाव दिले जाते. मागणी केल्यास कितीही दिले तरी रडतात, अशी अवहेलना कार्यकर्त्यांना नेत्यांकडून बरेचदा ऐकावी लागते. निवडणुकीचे दिवस कार्यकर्त्यांसाठी कमावण्याचे दिवस असल्याचे त्यांना पक्षातील वरिष्ठ हितचिंतकांकडून सांगितले जाते. त्यामुळे कार्यकर्त्यांचे महत्त्व निवडणूक काळात कमालीचे वाढलेले असते. पक्षांतरात जेवढे कार्यकर्ते सोबत येतात त्या प्रमाणात नेत्याची ताकद मानली जाते.

त्यामुळे नेत्यांना त्यांच्या मागेपुढे कार्यकर्त्यांची फौज बाळगावी लागते, परंतु ही फौज माध्यमांच्या कॅमेरा फोटोत येणे हा नेत्यांचा उपमर्द असतो. त्यामुळे असे कार्यकर्ते फोटोवेळी खड्यासारखे बाजूला काढले जातात. त्यांना लाथ मारली जाते किंवा हात धरून मागे सारले जाते. नेते याला राजशिष्टाचार म्हणतात. वापरा आणि फेकून द्या, हा धडा कार्यकर्त्यांनी नेत्यांकडूनच शिकलेला असतो. हेच धडे गिरवत एखाद्या संयमी कार्यकर्त्याचा यथावकाश नेता बनतो. कार्यकर्त्यापासून नेता बनलेल्या या नेत्यामागेही पुन्हा कार्यकर्ते उभे राहतात. पुन्हा त्यांनी फळाची अपेक्षा न करता कर्म करायचे असते आणि कर्ता म्हणून केवळ नेत्यांना पुढे करायचे असते. ही क्रिया कार्यकर्ता नेतेपदाला पोहचेपर्यंत चक्राकार गतीने अशीच सुरू असते. भाजपचे रावसाहेब दानवे यांनी याची एक झलक नुकतीच दाखवली. त्यांच्या लाथेचे कार्यकर्त्याने हसून स्वागत केले.

---

## नेत्यांना महागाईचे वावडे



विधानसभा निवडणूक प्रचाराच्या अगदी शेवटच्या टप्प्यात विकासाच्या मुद्यावरून राजकीय नेत्यांची गाडी थेट संविधानाचा रंग, शहरी नक्षलवादापासून बटेंगे तो कटेंगे आणि एक हैं तो सेफ हैं इथपर्यंत घसरली. अर्थात यात नॅरेटिव्हचा भाग जास्त असल्याने मतदारांच्या गोंधळात भर पडली नसेल तरच नवल.

एका बाजूला हा सर्व प्रचारकी धुरळा उडत असतानाच देशातील महागाईचे सरकारी आकडे जाहीर होत होते. यंदा निवडणुकीच्या रिंगणात सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावरील महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होत आहे. या लढतीत राज्य स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरावरील सर्वच नेते आपापली शस्त्रे परजून प्रचाराच्या रिंगणात उतरलेले दिसले.

अगदी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह जेपी नड्डा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, पीयूष गोयल आदी केंद्रीय मंत्र्यांचा समावेश होता, तर दुसऱ्या बाजूला लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, केसी वेणूगोपाल, डीके शिवकुमार, रेवंत रेड्डी आदी नेते होते.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आदी नेत्यांनीही दिवसरात्र प्रचारसभांचा अक्षरश: रतीब घातला.

यापैकी सर्वच नेत्यांनी जाहीर सभांमधून एकमेकांची उणीदुणी काढली, पण महागाई हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित महत्त्वाचा विषय असून एकाही नेत्याला आपल्या प्रचारसभेत हा मुद्दा प्रभावीपणे उचलून धरता आलेला नाही. एकवेळ सत्ताधारी पक्षाने महागाईच्या मुद्याला बगल देणे स्वाभाविकच आहे. पण विरोधकांपैकी काही नेत्यांना महागाईचा चकार शब्दही उच्चारावासा वाटला नाही, हेदेखील विशेष. दोनच दिवसांपूर्वी देशातल्या किरकोळ महागाईचे आकडे जाहीर झाले.

ग्राहक मूल्य निर्देशांकावर आधारित महागाईने ऑक्टोबरमध्ये ६.२१ टक्क्यांची पातळी गाठली आहे. ही महागाई मागील १४ महिन्यांच्या उच्चांकांवर जाऊन पोहोचली आहे. सप्टेंबरमध्ये हाच महागाई दर ५.४९ इतका होता. त्यात महिनाभरात ०.७२ टक्क्यांची भर पडली आहे.

देशातील महागाई ४ टक्क्यांच्या आत आणण्याची जबाबदारी केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेवर सोपवलेली असताना, प्रत्यक्षात महागाई दर रिझर्व्ह बँकेच्या समाधानकारक पातळीच्या म्हणजेच ६ टक्क्यांच्या वर जाऊन पोहोचला आहे. महागाई नियंत्रणात ठेवण्यात रिझर्व्ह बँकेला मागील काही वर्षांपासून सातत्याने अपयश येत आहे. ही निश्चितच चिंतेची बाब म्हणावी लागेल. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेने देशात नवीन सरकार येण्याची चाहूल लागताच व्याजदर कपात करत अमेरिकेतील नागरिकांसह जगभरातील गुंतवणूकदारांना मोठा दिलासा दिला आहे.

या पार्श्वभूमीवर भारतातदेखील आरबीआय फेडरल रिझर्व्हच्या पावलावर पाऊल ठेवत व्याजदर कमी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु महागाई हाताबाहेर गेल्यामुळे रिझर्व्ह बँक रेपो दरांमध्ये कपात करण्याची शक्यता आता कमीच आहे. राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार उत्पादित खाद्यवस्तूंचा महागाई दर ९.६९ टक्क्यांवर पोहचला आहे. हा दर सप्टेंबर महिन्यात ८.३६ टक्के होता, तर भाज्यांचा महागाई दर ४२.१८ टक्क्यांवर पोहचला आहे. हा दर सप्टेंबर महिन्यात ३५.९९ टक्के नोंदवण्यात आला. याशिवाय फळांचा महागाई दरही ७.६५ टक्क्यांवरून ८.४३ टक्क्यांवर पोहचला आहे.

यावरून ऐन सणासुदीच्या दिवसांत महागाई कोणत्या पातळीवर गेली आहे याचा अंदाज येतो. दिवाळीत उत्पादित वस्तू, खाद्यपदार्थ, विशेषकरून भाज्या, डाळी आणि खाद्यतेलाला प्रचंड मागणी असते. रशिया-युक्रेन, इराण-इस्त्रायल यांच्यातील संघर्षामुळे जागतिक पातळीवर अन्नपुरवठ्याची साखळी विस्कळीत झालेली असताना, कुठे अतिवृष्टी, तर कुठे अवकाळीचा फटका शेतीला बसलेला असताना देशांतर्गत बाजारपेठेत अन्नधान्यांचे दर वाढणे स्वाभाविकच होते, परंतु श्रावण महिन्यापासून वाढलेली महागाई आवरण्यात प्रचारसभांमध्ये गुंतलेल्या केंद्र सरकारला अद्यापही यश आलेले नाही.

दिवाळीच्या सणात बाजारपेठेतून मध्यमवर्गीय ग्राहक अभावानेच दिसून आला. वस्तूंच्या अव्वाच्या सव्वा किमती पाहून सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावर उत्साहापेक्षा त्रासिक भावच अधिक उठून दिसले. बऱ्याच ग्राहकांनी यंदाच्या दिवाळीत हातचे राखून अर्थात केवळ गरजेपुरतीच खरेदी केल्याने यंदा धंदा मंदा झाल्याची प्रतिक्रिया बाजारपेठेतील विक्रेत्यांमधून आजही उमटत आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंसह तयार खाद्यपदार्थांच्या विक्रीतही यावेळी घसरण नोंदवण्यात आली.

मध्यमवर्गीय ग्राहक हा बाजारपेठेचा केंद्रबिंदू समजला जातो. त्याच्याच हातात पैसा नसेल, तर तो चारचाकी-दुचाकी, सोने-चांदी खरेदी कशी करणार. यावेळी वाहन नोंदणी वा दागिने खरेदीचे कुठलेही विक्रमी आकडे नोंदवण्यात आले नाहीत, यावरून आपल्याला महागाई-बेरोजगारीच्या चक्रव्यूहात अडकलेल्या मध्यमवर्गीय ग्राहकांची स्थिती कळून येते. भाजीपाला आणि डाळी महागल्या की गृहिणींचा मोर्चा कडधान्याकडे वळतो.

परंतु कडधान्यांचे दरही प्रतिकिलो १३० ते २०० रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. या महागाईमध्ये येत्या काळात कांदा पुन्हा एकदा ग्राहकांना रडवण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर सत्ता कुणाचीही येवो, महागाईवर उतारा शोधून सर्वसामान्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची तसदी कोण घेणार का हा खरा प्रश्न आहे. कारण बटेंगे तो कटेंगे आणि एक हैं तो सेफ हैं या नारेबाजीने सर्वसामान्यांचे पोट भरणार नाही. महागाई कमी झाली तर भाकरी खायला मिळेल, हे त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे.

---

पान १ वरून...

### ६५ वर्षे जुना खासदार...

त्याजागी अधिसूचना जारी करून वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्याचाही प्रस्ताव आहे. विधेयकाच्या मसुद्यावर लोकांचे मत जाणून घेताना, विभागाने आठवण करून दिली की संसद (अपात्रता प्रतिबंधक) कायदा, १९५९ लागू करण्यात आला होता जेणेकरून सरकारच्या अंतर्गत लाभाची काही कार्यालये त्यांच्या धारकांना संसद सदस्य बनण्यासाठी किंवा निवडून येण्यासाठी अपात्र ठरवू शकत नाहीत. तथापि, या कायद्यात ज्या पदांच्या धारकांना अपात्र ठरवले जाणार नाही अशा पदांची यादी आहे आणि ज्या पदांचे धारक अपात्र ठरविले जातील त्यांची यादी देखील आहे. संसदेने या कायद्यात वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत. सोळाव्या लोकसभेत संयुक्त संसदीय समितीने या कायद्याचा सर्वंकष आढावा घेऊन अहवाल सादर केला. कायदा मंत्रालयाच्या विद्यमान कायद्यातील अप्रचलित नोंदी विचारात घेण्याची गरज समितीने व्यक्त केली. त्याच्या प्रमुख शिफारशींमध्ये 'पोझिशन ऑफ प्रॉफिट' ही संज्ञा 'मोठ्या प्रमाणावर' परिभाषित केली जावी.

### मतदानासाठी मतदार...

श्रम मंत्रालयाच्या योजनेंतर्गत दिलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना ड्रायव्हिंग लायसन्स, स्थायी खाते क्रमांक पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक आरजीआय यांनी दिलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र पासपोर्ट, छायाचित्र असलेली निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रे, केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले, छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र या १२ पुराव्यांचा समावेश आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार छायाचित्र ओळखपत्र असल्यास मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक पुरावा सोबत न्यावा. मतदानाचे चित्रीकरण, छायांकन करुन गोपनीयता भंग करणे हा निवडणूकविषयक गुन्हा आहे. त्यादृष्टीने मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी आहे. मतदानावेळी मतदान केंद्रात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मतदानाची गोपनीयता भंग होऊ नये, यासाठी मतदारांनी मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाऊ नये. मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांच्या सूचनांचे तंतोतंत पालन व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. दिवसे यांनी केले आहे.

### संविधान बदलण्याची कुणाची...

आणीबाणीच्या काळात काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची दुरुस्ती केली. परंतु आमचे सरकार येताच आम्ही त्या दुरुस्त्यांमध्ये बदल केला. ज्या काँग्रेसने संविधानाची ऐसीतैशी केली, तीच काँग्रेस आता संविधान बचावासाठी गावभर फिरत आहे, अशी टीकाही त्यांनी केली. चुकीच्या आर्थिक धोरणामुळे गेल्या ६० वर्षांमध्ये देशाचा जेवढा पाहिजे, तेवढा विकास झाला नाही, आपला देश श्रीमंत आहे पण, जनता मात्र गरीब आहे, अशी टीकाही त्यांनी केली. योग्य नीती, नेतृत्व आणि देशासाठी काम करणे, अशी मनोभावे आणि प्रामाणिकपणे इच्छा असली पाहिजे. अशीच इच्छा ठेवून आमच्या सरकारने काम केले, त्यामुळे जे ६० वर्षात काँग्रेस पार्टी करू शकली नाही, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आमच्या सरकारने काम करून दाखवले, असेही ते म्हणाले. देशात प्रकल्पांच्या कामासाठी पैशांची कमी नसून इमानदार नेत्याची फक्त गरज आहे, असेही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांची शिवशाही ही महाराष्ट्रात आली पाहिजे, शिवशाही म्हणजे आदर्श राज्य निर्माण करण्याची संकल्पना आहे. अशीच इच्छा स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची होती. सातत्याने तंत्रज्ञानात मोठे बदल होत आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर करूनच आपण देशाच्या शाश्वत विकास केला पाहिजे, असेही ते म्हणाले. ठाण्यातील वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची समस्या आजही कायम आहे. मात्र ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही वेगवेगळे प्रकल्प राबवत आहोत. यामुळे येथील वाहतूक कोंडी कमी होईलच आणि त्याचबरोबर प्रदूषण कमी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. घोडबंदर मार्गे जेएनपीटीकडे जाणाऱ्या वाहतूकीमुळे कोंडी होते. विविध प्रकल्पांमुळे कोंडीची समस्या कमी होईल. नवी मुंबईतील विमानतळ हे वॉटर टॅक्सीने जोडण्यात येणार असून यामुळे प्रवासाचा कालावधी कमी होणार आहे, असेही ते म्हणाले.

### ई ऑफिस प्रणालीअंतर्गत...

संपूर्ण सोडत प्रक्रिया संगणकीय झाल्याने मानवी हस्तक्षेप दूर झाला असून सोडतीत पारदर्शकता आल्याचे म्हटले जात आहे. सर्वसाधारण सोडतीसह बृहतसूचीवरील घरांची सोडतही आता संगणकीय करण्यात आली आहे. आता म्हाडातील सर्व सेवांचे संगणकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यानुसार टप्प्याटप्प्याने सेवांचे संगणकीकरण केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यातील सेवांच्या संगणकीकरणाला लवकरच सुरुवात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई इमारत दुरूस्ती आणि पुनर्रचना मंडळाअंतर्गत जुन्या इमारतींच्या पुनर्विकास प्रस्तावांना मुदतवाढ देण्याची, तसेच प्रस्तावांना 'ना हरकत' प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यात येणार आहे. तर म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकास प्रस्तावांनाही यापुढे संगणकीय पद्धतीनेच मान्यता दिली जाणार आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# सोहळ्यांचा पालिकेला भुर्दंड; लोकसभा, विधानसभा निवडणूक आचारसंहितेपूर्वी २८ कोटींचा खर्च

**■ मुंबई : राकेश गायकवाड**

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी शहर आणि उपनगरांमध्ये पार पडलेले भूमिपूजन, उद्घाटन, लोकार्पण, जंगी मिरवणुकांसाठीचा २८ कोटी ३१ लाख रुपयांचा खर्च मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीतून करण्यात आला. भारतीय निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी आचारसंहिता लागू केली. त्यानंतर १५ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यात आचारसंहिता लागू झाली. त्याआधी मुंबईतील महानगरपालिका तसेच एमएमआरडीए, एमएसआरडीसी आदी यंत्रणांच्या विविध प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजन, उद्घाटन थाटामाटात करण्यात आले. कार्यक्रमस्थळी उभारलेले भव्य मंडप, व्यासपीठ, आसनव्यवस्था, स्वच्छता, वृत्तपत्र, वृत्तवाहिन्यांना त्याबाबत देण्यात आलेल्या जाहिराती, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या आगमन मार्गावर करण्यात आलेली रंगरंगोटी, मार्गावरोधक आदींचा खर्च पालिकेच्या तिजोरीतून झाला आहे.

घाटकोपरमध्ये पार पडलेल्या जंगी मिरवणुकीची पूर्वतयारी आणि व्यवस्थेसाठी मुंबई पालिकेलाच निधी खर्च करावा लागला आहे. या मिरवणुकीच्या खर्चावरून वादही झाला होता, मात्र राजकीय दबावापोटी महापालिकेला खर्च करावा लागला होता.

टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आलेला मुंबई सागरी किनारा मार्ग, मुंबईमधील काही उड्डाणपुलांचे उद्घाटन, 'मेट्रो ३' प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचे लोकार्पण यासह काही प्रकल्पांचे भूमिपूजन, इतर सोहळे लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी उरकण्यात आले. महापालिका प्रशासनाने २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात



विविध कामांसाठी प्रस्तावित केलेल्या निधीतून या कार्यक्रमांचा खर्च भागवावा लागला आहे. त्यापूर्वीच्या २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रकल्पांचे भूमिपूजन, उद्घाटन, लोकार्पणासाठी महापालिकेने केवळ ३८ लाख रुपये खर्च केले होते. त्यातुलनेत २०२३-२४ या वर्षात महापालिकेला मोठा आर्थिक भूर्दंड सोसावा लागला आहे. कुलाबा, कफ परेड, नरिमन पॉइंट, चर्चगेट, सीएसएमटी परिसराचा समावेश असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या 'ए' विभाग कार्यालयाच्या हद्दीत २०२३-२४ मध्ये आयोजित विविध कामांसाठी महापालिकेने सर्वाधिक म्हणजे चार कोटी ५० लाख रुपये खर्च केले आहेत. त्याखालोखाल दादर, माहीमचा समावेश असलेल्या जी-उत्तर विभाग कार्यालयाच्या हद्दीतील कार्यक्रमांसाठी महापालिकेचे तीन कोटी ७० लाख रुपये खर्च झाले आहेत. तसेच एच-पूर्व परिसरात तीन कोटी ३० लाख रुपये, के-पूर्व परिसरात दोन कोटी ५५ लाख रुपये, एफ-उत्तर परिसरात दोन कोटी, पी-दक्षिणमध्ये एक कोटी ८३ लाख रुपये, बी विभाग कार्यालयाच्या हद्दीत एक कोटी ५८ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

# मतदार केंद्रावर भ्रमणध्वनी घेऊन जाण्यास बंदीच; निवडणूक आयोगाच्या निर्णयात हस्तक्षेपास उच्च न्यायालयाचा नकार

**■ मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रावर भ्रमणध्वनी घेऊन जाण्यास बंदी घालण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय कोणत्याही दृष्टीने बेकायदेशीर नाही, असे उच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले. तसेच, निवडणूक आयोगाच्या निर्णयात हस्तक्षेपास नकार देताना या निर्णयाला आव्हान देणारी मनसेने केलेली जनहित याचिका न्यायालयाने फेटाळली.निवडणूक प्रक्रियेच्या सुरळीत कामकाजासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा अधिकार केंद्रीय निवडणूक आयोगाला आहे, असेही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने मनसेचे कार्यकर्ता उजाला श्यामबिहारी यादव यांची याचिका फेटाळताना नमूद केले. निवडणूक प्रक्रिया ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे आणि त्यात डिजिलॉकर ॲपद्वारे ओळखपत्रे सादर करण्याची परवानगी देण्याची मागणी याचिकाकर्ता करत आहे. परंतु, कोणत्याही व्यक्तीला डिजिलॉकरद्वारे




त्यांच्या भ्रमणध्वनीमधील कागदपत्रे पडताळणीसाठी दाखवण्याचा अधिकार नाही. त्यामुळे, मतदान केंद्रावर भ्रमणध्वनी घेऊन जाण्यास बंदी घालणारा निवडणूक आयोगाचा निर्णय आम्हाला कोणत्याही दृष्टीने बेकायदा आढळून येत नाही, असे देखील खंडपीठाने यादव यांची याचिका फेटाळताना अधोरेखीत केले. तत्पूर्वी, मतदान केंद्रावर भ्रमणध्वनी घेऊन जाण्यास बंदी घालणारा आदेश १९९८ पासून अंमलात आहे. असे असताना याचिकाकर्त्याने त्याला आता आव्हान दिल्याची बाब केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने वरिष्ठ वकील आशुतोष कुंभकोणी आणि वकील अक्षय शिंदे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर, १९९८ पासून तंत्रज्ञानात खूप सारे बदल झाल्याची टिप्पणी न्यायालयाने केली. तथापि, केंद्रावरील अधिकाऱ्यांनी, तसेच मतदारांनी मतदानाचे महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने गोपनीयतेचा आदार केला पाहिजे. असे कुंभकोणी यांनी न्यायालयाला सांगितले.

# दीड हजार नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

**■ मुंबई : विशाल कारंडे**

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या निमित्ताने विकासकाने १६ वर्षापूर्वी चेंबूरमधील मारवाडी चाळीतील २२५ घरांचे पाडकाम केले. मात्र, अद्याप प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. यासंदर्भात रहिवाशांनी लोकप्रतिनिधींच्या कार्यालयात अनेक वेळा खेटे घालूनही त्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही. या विरोधात दीड हजार रहिवाशांनी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. चेंबूरमधील 'बसंत पार्क' या उच्चभ्रू कॉलनीलगत मारवाडी चाळ होती. या चाळीत २२५ घरे होती. एका विकासकाने १६ वर्षापूर्वी इमारतीतील घराचे स्वप्न दाखवून 'झोपु' योजना राबविण्याचा मानस व्यक्त





केला. तीन वर्षांत इमारतीत घर मिळणार असल्याने रहिवाशींनी या योजनेला होकार दर्शवला. त्यानंतर झोपड्या रिकाम्या केल्या. सुरुवातीचे काही महिने विकासकाने या झोपडीधारकांना वेळेवर घरभाडे दिले. मात्र, कालांतराने विकासकाने झोपडीधारकांना घरभाडे देणे बंद केले होते. गेली १६ वर्षे हे रहिवासी भाड्याच्या घरात राहत असून त्यासाठी त्यांना पदरमोड करावी लागत आहे.

याविरोधात रहिवाशांना भाड्यासाठी आंदोलन करावे लागले. त्यानंतरही दर महिन्याला विकासकाकडे घरभाड्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत, असे एका रहिवाशाने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले. अद्याप 'झोपु' योजनेत नवी इमारत उभी राहू शकलेली नाही.

## रवींद्र वायकर यांच्याविरोधातील जोगेश्वरी भूखंड घोटाळा प्रकरण बंद; गुन्हे शाखेने दाखल केलेला अहवाल न्यायालयाने स्वीकारला

**■ मुंबई : नितीन देवळेकर**

मुंबईतील जोगेश्वरी येथील सुप्रिमो क्लबचा गैरवापर करून तिथे हॉटेल्स बांधताना माहिती लपवल्याचा आणि बनावट माहितीच्या आधारे महापालिकेकडून विविध परवानग्या घेण्यात आल्याप्रकरणी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) खासदार रवींद्र वायकरग्ह आणि त्यांच्या पत्नीविरोधात दाखल प्रकरण बंद करण्याबाबत मुंबई पोलिसांनी दाखल केलेला अहवाल महानगरदंडादाधिकारी न्यायालयाने मान्य केला. त्यामुळे, वायकर यांना दिलासा मिळाला आहे.

मुंबई महापालिकेने वायकर यांच्याविरोधात गैरसमजातून गुन्हा दाखल केल्याचे नमूद करून आर्थिक गुन्हे शाखेने न्प्रकरण बंद करण्याची मागणी करणारा अहवाल न्यायालयात दाखल केला होता. याप्रकरणी सप्टेंबर महिन्यात महापालिकेचो उपअभियंता संतोष मांडवकर यांच्या तक्रारीवरून आझाद मैदान पोलीस ठाण्यात रविंद्र वायकर यांच्यासह त्यांची पत्नी मनीषा वायकर, त्यांचे व्यावसायिक भागीदार आसू नेहलनाई, राज लालचंदानी, पृथ्वीपाल बिंद्रा आणि वास्तुविशारद अरुण दुबे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास मुंबई पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा करत आहे. याच गुन्हयाच्या आधारावर सक्तवसुली संचालनानयनेही (ईडी) गुन्हा दाखल केला होता. मुंबईतील जोगेश्वरी येथील सुप्रिमो क्लबचा गैरवापर करून तिथे हॉटेल्स बांधताना माहिती लपवल्याचा आणि या माहितीच्या आधारे महापालिकेकडून विविध परवानग्या घेण्यात आल्या, असा आरोप वायकर यांच्यावर होता. तक्रारीनुसार, या भूखंडाबाबत २००४ मध्ये त्रिपक्षीय करार करण्यात आला होता. त्याअंतर्गत ६७ टक्के जागा सार्वजनिक वापर व ३३ टक्के जागा विकास कामासाठी वापरण्याबाबत अटी व शर्थी निश्चित करण्यात आल्या होत्या.




या ६७ टक्के भूखंड मनोरंजन व खेळासाठी निश्चित करण्यात आला होता. दरम्यान, नवीन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार (डीसीपीआर) भूखंडातील ७० टक्के भाग पुन्हा पालिकेला दिल्याचे दाखवून ३० टक्के जागेवर १४ मजली हॉटेल बांधण्याचा परवानगी मिळवण्यात आली, असा आरोप होता. याबाबत समजल्यानंतर महापालिकेने १६ जून २०२३ रोजी बांधकामाची परवानगी रद्द केली होती. भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी याच प्रकरणात वायकर यांच्यावर गंभीर आरोप केले होते. हा कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला होता. वायकर यांनी याप्रकरणी महापालिकेच्या कारवाईविरोधात उच्च न्यायालयातही धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळली होती.

# दादर – माहीम विधानसभेत भाजपचा मनसेला अप्रत्यक्ष पाठिंबा? भाजपच्या महिला विभाग अध्यक्षच्या फेसबुक पोस्टमुळे उलटसुलट चर्चांना उधाण

**■ मुंबई : सम्यक कासारे**

'भोंगा, हलाल आणि अनाधिकृत मजारला जो कसलीही भीती न बाळगता विरोध करणार, आम्ही त्यांना मत देणार', अशा आशयाची पोस्ट भाजपच्या माहीम विधानसभा अध्यक्ष अक्षता तेंडुलकर यांनी फेसबुक या समाजमाध्यमावर केल्यामुळे दादर – माहीम विधानसभेत उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. अशी विधाने करून भाजपने महायुतीतील शिंदे गटाचे उमेदवार सदा सरवणकर यांची कोंडी करून अप्रत्यक्षपणे मनसेचे उमेदवार अमित ठाकरे यांना पाठिंबा दिला का? अशी शंका व्यक्त करत समाजमाध्यमांसह मतदारसंघात या पोस्टची चर्चा रंगली आहे. सध्या राज्यभर विधानसभा निवडणुकीचे वारे जोरदार वाहत असून प्रचारसभांचा धडाका सुरू आहे. दादर – माहिम विधानसभा मतदारसंघातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात उमेदवार देऊ नये, अशी भूमिका भाजपने सुरुवातीपासूनच घेतली होती. यावरून शिंदे गट व भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये खटकेही उडाले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सदा सरवणकर राज ठाकरे यांच्या दादर येथील निवासस्थानी भेटण्यास गेले होते. पण राज ठाकरे यांनी भेट नाकारल्याने सरवणकर यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदा सरवणकर यांच्या प्रचारात भाजपच्या कार्यकर्त्यांची तुरळक उपस्थिती पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर आता



भाजपच्याच माहीम विधानसभा अध्यक्षांची पोस्ट ही चर्चेचा विषय ठरली आहे. राज ठाकरे यांनी सातत्याने मशिदीवरील भोंग्यांचा मुद्दा उपस्थित केला आहे, तसेच त्यांनी शिवाजी पार्कवरील गुढीपाडवा मेळाव्याच्या भाषणात माहीमच्या समुद्रात अनाधिकृतरित्या बांधण्यात आलेल्या मजारचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने ते बांधकाम हटवले; त्यामुळे भोंगा व अनधिकृत मजारचा मुद्दा भाजपच्या तेंडुलकर यांच्या पोस्टमध्ये असल्यामुळे भाजपने अप्रत्यक्षपणे मनसेच्या अमित ठाकरे यांना मतदान करण्याचे आवाहन केले का ? अशी जोरदार चर्चा रंगली आहे. 'माझ्यासाठी राष्ट्र प्रथम असून दादर – माहीम विधानसभेत कट्टर हिंदुत्ववादी उमेदवार निवडून यावा, अशी माझी इच्छा आहे. राज ठाकरे यांनी भाजपला विरोध केला नसून पुढचा मुख्यमंत्री भाजपचा होईल, असे विधानही त्यांनी केले होते. कोणतीही सत्ता नसताना ते रोखठोकपणे बोलत असतात. त्यामुळे दादर – माहीम विधानसभेतील मतदारांमध्ये राज ठाकरेंबद्दल एक विश्वास व प्रेम आहे.

# तारीख वीस, आमदार फिक्स... उमेदवारांच्या घोषवाक्य प्रतिभेला बहर

**■ मुंबई : यश सावंत**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. प्रत्यक्ष घरोघरी भेटीपासून सुरू झालेला हा प्रचार पत्रके आणि समाजमाध्यमांपर्यंत सुरू आहे. समाजमाध्यमांवर सध्या उमेदवारांचा प्रचार सुरू असून यात दिलेल्या घोषवाक्यातून प्रतिभेला अक्षरश: बहर आला आहे. यमक जुळवून स्वत:चा प्रचार करण्याबरोबरच विरोधकांचा अप्रचार करण्याची शक्कलही या घोषवाक्यात काहींनी जुळवून आणली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाचा दिवस जवळ आला असून प्रचारही अंतिम टप्प्यावर आला आहे. पहिल्या टप्प्यात गृहभेटी, नंतर पदयात्रा, प्रचार रॅलीद्वारे प्रचाराला सुरुवात झाली. आता प्रचार सभा सुरू झाल्या आहेत. त्याचबरोबर सर्व उमेदवारांचा समाज माध्यमांवरूनही प्रचार सुरू आहे. समाज माध्यमांवरील प्रचारात कमीतकमी शब्दात आपला प्रचार करण्याची युक्ती सर्वच उमेदवारांनी



लढवली आहे. त्यातही काही उमेदवारांच्या घोषणा, घोषवाक्ये खूप गाजत आहेत.


शिवसेनेची दोन शकले झाल्यानंतर ही पहिली विधानसभा निवडणूक होत आहे. या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या निष्ठावंत उमेदवारांना संधी दिली असून या निवडणुकीला निष्ठा विरुद्ध गद्दारी असा रंग दिला आहे. त्यामुळे ज्या मतदारसंघात शिवसेनेच्या दोन गटातील उमेदवारांमध्ये लढत आहे तिथे ठाकरे गटाच्या उमेदवारांनी 'गद्दार नकोष्ठ खुद्दार हवा' या घोषवाक्याचा प्रचारासाठी वापर करण्यात ये आहे. शिवसेनेच्या पारंपरिक मतदारांना या वाक्यातून साद घातली आहे. तसेच 'ठाकरे सरकार आणूयाष्ठ', 'ठाकरेंचा शिलेदार निवडू या' ही घोषणाही बघायला मिळत आहे. शिवडीमध्ये शिवसेनेचे (ठाकरे) उमेदवार अजय चौधरी यांच्या प्रचारात 'अजय शिवडीचा, विजय शिवसेनेचा' ही घोषणा लक्षवेधी ठरत आहे.

अनेक आमदारांची ही निवडणूक लढवण्याची दुसरी किंवा तिसरी वेळ आहे. त्यांच्या प्रचारात तसा उल्लेख आढळतो. अंधेरीतील भाजपचे उमेदवार अमित साटम यांच्या प्रचारात 'अंधेरी कहे दिलसेष्ठअमित साटम फिरसे' हे घोषवाक्य लक्षवेधी ठरत आहे. तर घाटकोपरचे भाजपचे उमेदवार पराग शाह यांच्या प्रचारातील घोषवाक्य 'घाटकोपर की यही स्पिरिटष्ठ पराग शाह फिरसे रिपीट' हे देखील लक्षवेधी ठरत आहे. ज्या मतदारसंघात एकाच कुटुंबाकडे अनेक वर्षे उमेदवारी आहेत त्या मतदारसंघात 'परिवर्तन हवे परिवारवाद नको' अशीही घोषणा ऐकायला, वाचायला मिळत आहे. तर काही ठिकाणी 'तारीख वीस, आमदार फिक्स' अशी घोषणा कानावर पडत आहे.

# धारावी बचाव आंदोलनकर्त्यांचा वचननामा जाहीर, शौचालयाला प्राधान्य

**■ मुंबई : गणेश बागडे**

'धारावी बचाव मंच' या संघटनेने धारावी मतदारसंघातून अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविला असून संघटनेने आपला वचननामा जाहीर केला आहे. संघटनेचे उमेदवार संदीप कटके यांनी मंचचे ॲड. संदीप कटके हे निवडणूक लढवणार आहेत. कटके हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असून त्यांनी इतर राजकीय पक्षाप्रमाणेच आपल्या संघटनेचा वचननामा जाहीर केला आहे. ५०० रुपयांच्या शपथपत्रावर हा वचननामा जाहीर करण्यात आला




५०० रुपयांच्या शपथपत्रावर धारावीकरांसाठी सहा वचने दिली आहेत. त्यात शौचालयाला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच धारावीच्या पुनर्विकासात एकही कुटुंब धारावीच्याबाहेर जाणार नाही, असेही वचन त्यात देण्यात आले आहे. धारावी मतदारसंघात यावेळी धारावी पुनर्विकासाचा मुद्दा गाजत असून याच मुद्द्यावर काम करणाऱ्या धारावी बचाव आहे. या वचननाम्यात त्यांनी सहा मुद्द्यांवर भर दिला आहे. धारावीतील लोकसंख्येच्या तुलनेत शौचालयांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यामुळे अडीचशे लोकांमागे एक शौचकूप इतकी भयावह स्थिती असल्यामुळे वचननाम्यात पहिल्या क्रमांकावर शौचालयाचा मुद्दा घेण्यात आला आहे. तर उर्वरित मुद्द्यांमध्ये धारावी पुनर्विकासाचा मुद्दा घेण्यात आला आहे.

# साडेसहाशे गृहनिर्माण संस्थांमध्ये होणार मतदान, मुंबईत प्रथमच मोठ्या स्तरावर प्रयोग, मतदान वाढण्याची अपेक्षा

**■ मुंबई : विशाल कारंडे**

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रांवर संध्याकाळपर्यंत झालेली गर्दी टाळण्यासाठी यंदा मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात आली असून प्रायोगिक तत्वावर गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही मतदान केंद्र सुरू करण्यात आला आहे. संपूर्ण मुंबईत तब्बल साडेसहाशे गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे मतदान केंद्रावरील मतदारांची गैरसोयही टळणार आहेच, पण मुंबईतील मतदानाचा टक्काही वाढण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्राबाहेर लागलेल्या रांगांमुळे मतदारांना उन्हात ताटकळत उभे राहावे लागले होते. एकेका मतदान केंद्रावर जास्त संख्येने मतदार असल्यामुळे मतदानाची वेळही वाढवावी लागली होती. अनेक मतदार मतदान न करताच घरी परतले होते. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या नियोजनावर खूप टीका झाली होती. यावेळी खबरदारी घेऊन विधानसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात येणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी दीड हजार मतदारांची संख्या आता सरासरी एक हजार ते १२०० पर्यंत असेल. त्यामुळे लोकसभेच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्याही वाढली आहे. यावेळी मुंबईतील मतदान केंद्रांची संख्या १० हजार १११ इतकी आहे. तसेच यावेळी मुंबईतील गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही मतदान केंद्रे सुरू करण्यात येणार आहे. यावेळी तब्बल साडेसहाशे गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहे.



निवडणूक आयोगाला मतदान केंद्रासाठी जागा ताब्यात घेण्याचे पूर्ण अधिकार आहेत. मात्र तरीही ज्या गृहनिर्माण संस्थांनी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे त्याच ठिकाणी मतदान केंद्रे उभारले आहे. अन्यथा मुंबईत अनेक शाळा असून त्यात मतदान केंद्रे उभारली आहेत. मात्र लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी सोसाव्या लागलेल्या उन्हाच्या झळा यावेळी टळतील. त्यामुळे मतदारांच्या सोयीसाठी सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहे. याकरीता सूसूक्ष्म नियोजन केले असून त्याचा मतदान वाढीसाठी चांगला फायदा होईल, अशी शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

मोठ्या गृहनिर्माण संस्था किंवा गृहनिर्माण संकुलांमध्ये मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. पाचशेपेक्षा जास्त सदस्य संख्या असलेल्या गृहनिर्माण संकुलांमध्ये ही केंद्रे आहेत. ज्या गृहनिर्माण संस्थांनी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे अशा संस्थांमध्येच ही केंद्रे सुरू करण्यात आल्याची माहिती अतिरिक्त जिल्हाधिकारी, निवडणूक समन्वयक फरोग मुकादम यांनी दिली. अशा सोसायट्यांमधील मोकळ्या जागेत किंवा वाहनतळाच्या ठिकाणी ही केंद्रे तयार करण्यात येणार आहेत. अशा सोसायट्यांमध्ये शक्यतो ९० टक्के मतदार हे त्या सोसायटीतील असतील.

# गुजरातच्या निरीक्षकांची लाचारी का पत्करतात? उद्धव ठाकरे यांचा बोईसर येथे सवाल

■ **पालघर : सचिन कदम**

गुजरात राज्यातील भाजपाचे लोक पालघर मध्ये येऊन बसले असून ते जिल्ह्यातील निवडणूक प्रचारावर नियंत्रण ठेवत आहेत. ही मंडळी शेव-ढोकळा घेऊन आली आहेत का असा सवाल करत आपली बॅग तपासली जात असताना गुजरात मधील प्रचारकांकडे प्रशासन लक्ष का देत नाही असा सवाल शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बोईसर येथील सभेत उपस्थित केला.

लोकसत्ता मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची दखल घेऊन निवडणुकीसाठी पालघर जिल्ह्यात दाखल झालेल्या गुजरातच्या लोकप्रतिनिधी व पक्षीय पदाधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील निवडणूक प्रचारावर नियंत्रण ठेवले जात असल्याकडे लक्ष वेधून जिल्ह्यातील मराठी माणूस मेला आहे का? लाचारी का पत्करता ? असे सवाल उपस्थित केले. वेगवेगळ्या नेतेमंडळींच्या बॅगा तपासल्या जात असल्या तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बॅग तपासली गेली नसल्याचे त्यांनी सांगून त्यांच्या बॅगेत नुसत्या थापा असतील असे त्यांनी सांगितले. हेलिपॅड वर त्यांच्या बॅगा तपासण्याचे वेळी आपण गुजरातचे अधिकारी आहात का अशी त्यांनी खोचकपणे विचारणा केली. ही निवडणूक आपण हरलो तर पालघरच्या जनतेवर वाढवण व मुरबे येथील बंदर लादले जाईल असे सांगत महाविकास आघाडी



सत्तेत आल्यास वाढवण व मुरबे बंदर प्रकल्प रद्द केला जाईल असे सांगितले. अदानी आपले कोणी लागत नाही असे सांगत लोकसभा निवडणुकीत केलेल्या चुकीची पुनरावृत्ती करू नका असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

पालघर जिल्हा हा वैविध्यपूर्ण नैसर्गिक सौंदर्याने नटलेला असून जिल्ह्याच्या किनारपट्टीचे पर्यटनासाठी विकसीत करणे तसेच जव्हार सारख्या डोंगरी भागात थंड हवेचे ठिकाण (हिल स्टेशन) विकसित करणे शक्य असल्याचे सांगितले. पालघर मध्ये विमानतळ उभारणे आवश्यक असून पालघर जिल्हयासाठी विकास आराखडा आपल्या मनात असल्याचे त्यांनी प्रचार सभेत सांगितले. आपण विकासाच्या विरुद्ध नसून जिल्ह्याचा विनाश होऊ देणार नाही असे त्यांनी पुढे सांगितले. राज्याच्या किनारपट्टीला धोका असून क्लस्टर डेव्हलपमेंट च्या नावाखाली कोळीवाडे उध्वस्त केले जातील अशी भीती व्यक्त करत सत्तेत आल्यानंतर यासंदर्भातील आदेश फाडून टाकू असे त्यांनी सांगितले. स्व. चिंतामण वनगा यांच्या निधनानंतर त्यांच्या मुलाने शिवसेनेत प्रवेश केला होता, मात्र त्यानंतर त्यांचा कसा वापर केला हे आपण सर्व जाणता असे सांगत भाजपा ही वापरा आणि फेका पद्धतीचा अवलंब करत असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पालघर आणि बोईसर विधानसभेचे उमेदवार जयेंद्र दुबळा आणि डॉ. विश्वास वळवी यांच्या प्रचारार्थ पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बोईसर येथील खैरापाडा मैदानावर जाहीर सभा घेतली.

# मुंबई महापालिकेतील अभियंत्यांची भरती आता निवडणुकीनंतर; २६ नोव्हेंबरनंतर अर्ज भरण्याचा कालावधी

■ **मुंबई: प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेतील कनिष्ठ व दुय्यम अभियंत्यांची पदभरती आता थेट निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतरच होणार आहे. एकूण ६९० जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया ११ नोव्हेंबरपासून सुरू होणार होती. मात्र पालिका प्रशासनाने आता यात बदल केला असून २६ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत अर्ज करता येणार आहेत. मुंबई महापालिकेत मोठ्या संख्येने कनिष्ठ अभियंता व दुय्यम अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. गेल्या चार – पाच वर्षांपासून ही पदे भरण्यात




आली नव्हती. त्यामुळे अभियंत्यांची भरती करावी या मागणीसाठी अभियंत्यांच्या संघटनांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. मात्र या पदांसाठीची भरती प्रक्रिया सुरू होत नव्हती. गेल्या महिन्यात पालिका प्रशासनाने अभियंत्यांच्या पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य), दुय्यम अभियंता (यांत्रिकी आणि विद्युत) या पदांच्या एकूण ६९० जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. पालिका प्रशासनाने आचारसंहितेच्या तोंडावर या पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती व ११ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत अर्ज भरण्याची तारीख जाहीर करण्यात आली होती. मात्र १५ ऑक्टोबरपासून आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे नुकतेच पालिका प्रशासनाने या भरती प्रक्रियेच्या कार्यक्रमात बदल झाल्याचे जाहीर केले आहे. नव्या वेळापत्रकानुसार उमेदवारांना २६ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत अर्ज करता येणार आहेत. मुंबईत विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

# मविआ सरकारमुळे राज्याला आजही दुष्परिणाम भोगावे लागताहेत, केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र शेखावत यांची टिका

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

पाच वर्षापुर्वी महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला जनादेश दिला असतानाही त्याचा अपमान करत महाविकास आघाडीने सरकार स्थापन केले आणि अडिच वर्षात हे सरकार पडले. या सरकारच्या काळात भ्रष्टाचार वाढला, मेट्रोसह अनेक प्रकल्प थांबले, त्याचे दुष्परिणाम राज्याला आजही भोगावे लागत आहेत, अशी टिका केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र शेखावत यांनी शनिवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली. लाडकी बहिण योजनेद्वारे आम्ही महिलांना लाच देतो, असे विधान काँग्रेसचे नेते एकप्रकारे मातृशक्तीचा अपमान करित असल्याची टिकाही त्यांनी केली.

ठाणे येथील कापुरबावडी भागातील भाजपच्या मिडीय सेंटरमध्ये शनिवारी दुपारी



केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र शेखावत यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस आणि महाविकास आघाडीवर टिका केली. यंदाच्या निवडणुकीत राज्याच्या भाग्याचा निर्णय होणार आहे. त्यामुळे पाच वर्षापुर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर काय घडले, याचे जनतेने स्मरण करायला हवे. या निवडणुकीत राज्यातील जनतेने शिवसेना-भाजप महायुतीच्या बाजून जनादेश दिला. असे असतानाही जनतेच्या जनादेशाचा अपमान करत महाविकास आघाडीने राज्यात स्थापन केली. अडीच वर्षातच हे सरकार पडले. या काळात महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झाले. या सरकारच्या काळात प्रचंड भ्रष्टाचार वाढला. मेट्रो तसेच इतर प्रकल्पांची कामे थांबविण्याचे काम मविआ सरकारने केले. एकूणच मविआ सरकारच्या कामामुळे राज्याला दुष्परिणाम भोगावे लागत आहेत, अशी टिका मंत्री शेखावत यांनी केली. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुक सुरू असून याच काळात काँग्रेसने देशभरात नवी पद्धत पुढे आणली आहे. लोकांना भुलवणारे आणि आधारहीन घोषणा काँग्रेसकडून करण्यात येत आहे. काँग्रेसला माहित आहे की आपण सत्तेवर येणार नाही.

# भालिवली येथील कुंडात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

■ **वसई: सतीश सोनवणे**

वसई पूर्वेच्या भालिवली येथील कुंडात पोहण्यासाठी गेलेल्या दोन तरूणांचा बुडून मृत्यू झाला. घरात न सांगता हे दोन्ही तरूण या कुंडाच्या परिसरात फिरण्यासाठी गेले होते. तुषार बेनकुड (२१) हा तरुण नालासोपारा पश्चिमेच्या यशवंत गौरव येथे आपल्या कुटुंबियासमवेत रहात होता. शुक्रवारी संध्याकाळी मुंबईतील कुर्ला येथे राहणारा त्याचा मित्र पवन बोडके (१९) त्याला भेटायला आला होता. दोघेही घरी न सागता दुचाकीने फिरायला गेले होते. बराच वेळ मुलगा घरी न आल्याने तुषारचे वडील चंद्रकात बेनगुडे यांनी शोधाशोध सुरू केली. तुषारचे मोबाईल लोकेशन काढले असता ते वसई पूर्वेच्या भालिवली गावाजवळ आढळले. स्थानिकांच्या मदतीने शोध घेतला असता त्या परिसरातील एका नदीजवळ त्यांची दुचाकी आढळली. पुढे साधारण दीड किलोमीटर चालत गेल्यावर पाण्याचे कुंड दिसले. स्थानिक आदिवसांनी पाण्यात उडी मारून शोध घेतला असता पवनचा मृतदेह आढळला. मात्र तुषार सापडला नव्हता.

शनिवारी तुषारच्या वडिलांनी याबाबत मांडवी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी शनिवारी रात्री शोध घेऊन नंतर तुषारचा मृतदेह काढला. कुंडातील पाण्यात दोन्ही तरुण पोहण्यासाठी उतरले होते. मात्र पोहता येत नसल्याने बुडून त्यांचा मृत्यू झाला. या दोघांची बॅग अथवा



कपडे मात्र आढळले नाही, अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार वाल्मिक हेंबाडे यांनी दिली. हे कुंड भालिवली गावापासून आत जंगलात आहे. तेथे पायवाट असून त्यावरून दुचाकी देखील जात नाही. या ठिकाणी कुणी फिरायला जात नाही तसेच येथे कधी कुठलीही दुर्घटना देखील घडली नसल्याचे स्थानिकांनी सांगितले. तुषार आणि पवन हे दोन्ही तरुण एकाच अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत होते.

# काँग्रेस नेते मुझफ्फर हुसेन यांच्या नावाचे बनावट पत्र: शिवसेना नेत्या शायना एनसी यांच्यावर गुन्हा दाखल

■ **भाईंदर : आकाश कांबळे**

काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष मुझफ्फर हुसेन यांच्या नावे एक्स समाजमाध्यमावर बनावट पत्र प्रसारीत केल्याप्रकरणी शिवसेना शिंदे गटाच्यान नेत्या शायना एनसी यांच्यावर मिरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी यापूर्वीच भाजपाच्या तीन जणांविरोधात गुन्हे दाखल आहेत. मुंबई बॉम्बस्फोट प्रकणातील याकूब कुरेशी याला फाशीच्या शिक्षेतून सवलत द्यावी यासाठी मुझफ्फर हुसेन यांनी स्वाक्षरी केलेले बनवाट पत्र समाजमाध्यमावर प्रसारीत करण्यात आले होते. मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडी तर्फे मुझफ्फर हुसेन निवडणूक लढवत आहेत. या निवडणूकीत महायुतीचे नरेंद्र मेहता आणि अपक्ष उमेदवार गीता जैन रिंगणात आहेत. या प्रचारादरम्यान मुझफ्फर हुसेन यांच्या नावाचे एक बनावट पत्र समाजमाध्यमवर





प्रसारीत करण्यात आले होते. मुंबई बॉम्बस्फोट हलूयातील आरोपी असलेल्या याकूब मेमेनला फाशीच्या शिक्षेतून सवलत द्यावी अशा आशयाच्या एका पत्रावर मुझफ्फर हुसेन यांनी स्वाक्षरी केली होती, असा आरोप भाजपाने केला होता. या संदर्भातील बनावट पत्र समाजमाध्यमावर प्रसारीत करण्यात आले होते. याप्रकरणी ५ नोव्हेंबर रोजी भाजप पदाधिकारी जेराम डिसुजा, कुणाल शुक्ला, गणेश मुर्गन आणि अन्य २० जणांवर मिरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शिवसेना (शिंदे गट) उमेदवा शायना एनसी यांनी देखील हुसेन यांची स्वाक्षरी असलेले बनावट पत्र 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या समाजमाध्यमवार प्रसारीत केले होते. या प्रकरणात शायना एनसी यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची मागणी मुझफ्फर हुसेन यांनी पोलिसांकडे केली होती.

# मतदारांना आमिषे दाखविण्यास सुरवात; भाईंदरमध्ये मद्य आणि मासळाची साठा जप्त

■ **भाईंदर : आकाश कांबळे**

भाईंदरच्या देवल नगर परिसरातील झोपडपट्टयांमध्ये वाटपासाठी आलेल्या विदेशी मद्य आणि मासळीचा साठा भाईंदर पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी रिक्षाचालकासह एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र हा कार्यकर्ता गीता जैन चा असल्याचा आरोप भाजपने केल्याने राजकीय वातावरण पेटले आहे.

विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर परिसरात मद्य आणि मासळीचे वाटप केले जाणार असल्याची माहिती भाईंदर पोलिसांना



मिळाली होती. त्यानुसार भाईंदर पोलिसांचे एक पथक गणेश देवल नगर परिसरातील खाडी किनाऱ्यावर तपासणीसाठी गेले होते. त्यावेळी तेथे त्यांना एक रिक्षा संशयास्पदरित्या दिसून आली.या रिक्षाची तपासणी केली असता त्यात असलेल्या चार बॉक्स मध्ये १९२ दारूच्या बाटल्यात आणि चार किलो मासळी आढळून आली. याबाबत रिक्षा चालक लालजी राजभर यांच्याकडे विचारणा केली असता त्याने इरफान पठाण नामक व्यक्तीच्या सांगण्यावरून मिरारोड येथून मद्य आणि मासळी घेऊन आला असल्याचे पोलिसांना सांगितले. या प्रकरणी पोलिसांनी मद्य व मासळी चा साठा जप्त करत, रिक्षा चालक राजभर तसेच इरफान पठाण याच्या विरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलमाअतंर्गत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणानंतर राजकीय वातावरण पेटले आहे.गुन्हा दाखल असलेला आरोपी इरफान पठाण हा अपक्ष उमेदवार गीता जैन यांचा कार्यकर्ता असल्याचा आरोप भाजपने केला आहे. जैन समर्थकांनी मात्र याचा इन्कार केला आहे.

# गावाकडच्या दुबार मतदारांमुळे नवी मुंबईत खळबळ

■ **नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरातील ऐरोली आणि बेलापूर या दोन मतदारसंघात ७३ हजार दुबार मतदार असल्याचा दावा शिवसेना शिंदे गटाने केला आहे. दुबार मतदारांसाठी काही राजकीय मंडळी विशेष वाहनांची व्यवस्था करून त्यांना रातोरात गावी पाठवीत आहे. त्यानंतर तातडीने त्यांना पुन्हा मतदान करण्यासाठी नवी मुंबईत आणले जाते, असा आरोप शिंदे गटाने केला आहे. नवी मुंबई हे शहर



ठाणे आणि मुंबईपासून जवळचे आहे. या शहरात ऐरोली आणि बेलापूर हे दोन मतदारसंघ येतात. नवी मुंबईत प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील रहिवाशांचे वास्तव्य अधिक आहे. यातील ऐरोली मतदारसंघातून भाजपकडून गणेश नाईक हे महायुतीचे उमेदवार आहेत. त्यांच्याविरोधात शिवसेना शिंदे गटाचे बंडखोर विजय चौघुले आणि ठाकरे गटाचे एम. के. मढवी निवडणूक लढवीत आहेत. तर बेलापूर मतदारसंघात भाजपच्या मंदा म्हात्रे निवडणूक लढवीत आहेत. याच मतदारसंघातून गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक हे राष्ट्रवादीकडून (शरद पवार गट) निवडणूक लढवीत आहेत.

शिवसेना शिंदे गटाचो संपर्कप्रमुख तथा माजी नगरसेवक किशोर पाटकर यांनी नवी मुंबईत एकूण ७३ हजार २३२ मतदार दुबार असल्याचा दावा केला आहे. यामधील ऐरोली विधानसभा क्षेत्रात ४१ हजार ५४६ आणि बेलापूर विधानसभा क्षेत्रात ३१ हजार ६८६ मतदारांची दुबार नावे नोंदविल्याचे म्हटले आहे.

# कर्जाला कंटाळून मनपा अधिकाऱ्याची आत्महत्या

■ **नवी मुंबई : धनश्री सट्टा**

नवी मुंबई महानगर पालिकेचे अधिकारी मनोहर गांगुर्डे यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. हि घटना शनिवारी समोर आली असून कामोठे पोलीस अधिक तपास करीत आहेत. नवी मुंबई महानगर पालिकेच्या ऐरोली



विभाग कार्यालयात प्रशासन अधिकारी म्हणून मनोहर गांगुर्डे हे कार्यरत होते. ते स्वतः कामोठे सेक्टर १६ येथील प्रेमअंबरसोसायटीत राहत होते. त्यांनी शुक्रवारी अपरात्री याच ठिकाणी गळफास घेत आत्महत्या केली आहे. ते दरवाजा उघडत नसल्याचे समोर आल्यावर या बाबत शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिल्यावर पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यावर त्यांनी गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यांना गृहकर्जाची नोटीस आल्याचे आढळून आले.

# कल्याण ग्रामीणमधील विधानसभा मतदारसंघात शिळफाटा येथे वाहनातून पाच कोटी जप्त

■ **कल्याण : आकाश कांबळे**

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील शिळफाटा येथे शनिवारी एका वाहनातून निवडणूक विभागाच्या स्थिर सर्वेक्षण पथकाने पाच कोटी ५५ लाखची रक्कम जप्त केली. ही रक्कम १० लाखापेक्षा अधिक असल्याने ही रक्कम प्राप्तिकर विभागाकडे अधिकच्या चौकशीसाठी दिली



आहे, अशी माहिती कल्याण ग्रामीण विधानसभा विभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी माध्यमांना दिली.शिळफाटा परिसरात स्थिर सर्वेक्षण विभागाचे एक पथक कार्यरत आहे. हे पथक शनिवारी सकाळी संशयास्पद वाहनांची तपासणी करत होते. त्यावेळी त्यांना एका वाहनाची तपासणी करत असताना त्या वाहनात मोठ्या प्रमाणात रक्कम आढळली. या रकमेची मोजणी केल्यावर ही रक्कम पाच कोटी ५५ लाख आढळली. पथकाने ते वाहन बाजुला घेतले. या रकमेबाबत काही अधिकृत कागदपत्रे आपणासोबत आहेत का अशी विचारणा वाहनातील व्यक्तिंना केली. या रकमेबाबत वाहनातील व्यक्ति कोणतीही माहिती निवडणूक पथकाला देऊ शकले नाहीत. त्यामुळे पथकाने ही माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांना कळवली.

ही रक्कम संशयास्पद असल्याने ही माहिती प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. पंचांसमक्ष या रकमेचा पंचनामा करून ही रक्कम प्राप्तिकर अधिकाऱ्यांनी अधिकच्या चौकशीसाठी ताब्यात घेतली. निवडणुकीचा अंतीम टप्पा सुरू झाल्याने मोठ्या प्रमाणात उलाढाली होण्याची शक्यता विचारत घेऊन निवडणूक पथकांनी जोरदार वाहन तपासणी मोहीम सुरू केली आहे.

# 'डॉ. आंबेडकरांना भारतरत्न नरेंद्र मोदींनी दिला', संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा दावा

■ **वसई : सुचिता देशमुख**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काँग्रेस पक्षाने उपेक्षा केली. डॉ. आंबेडकरांना भारतरत्न पुरस्कार काँग्रेसने नाही तर नरेंद्र मोदी यांनी दिला असा दावा केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केला. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी शनिवारी सिंग वसईत आले होते.

वसई विधानसभेतील महायुतीच्या उमेदवार स्नेहा दुबे-पंडित यांची जाहीर प्रचार सभा शनिवारी संध्याकाळी वसईच्या दिवाणमान येथील मैदानात संपन्न झाली. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गुजराथचे गृहमंत्री हर्ष संघवी उपस्थित होते. आपल्या भाषणात सिंह यांनी काँग्रेस पक्षावर हल्लाबोल केला. काँग्रेस नेते राहुल गांधी आज संविधानाचा आधार घेत



आहेत मात्र ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिले त्यांची काँग्रेसने सतत उपेक्षा केली असे ते म्हणाले. डॉ आंबेडकर मुंबईतून निवडणुकीला उभे असताना काँग्रेसने त्यांच्या समोर उमेदवार उभा करून त्यांचा पराभव केला असे ते म्हणाले. काँग्रेस ५२ वर्षे देशात सत्तेवर होती. काँग्रेस बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्कार देऊ शकली असती. पण त्यांना भारतरत्न पुरस्कार काँग्रेसने नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला असा दावा त्यांनी केला. बाबासाहेब देश विदेशात ज्या ज्या ठिकाणी राहिले त्या सर्व स्थळांचा पंततीर्थ म्हणून विकास केला असेही सिंह म्हणाले. काँग्रेस अनुसुचित जाती जमातीची जनगणना करण्याची मागणी करत आहे. मात्र कुठल्या जातीला किती आरक्षण देणार हे जाहीर करत नाही. काँग्रेस लोकांची दिशाभूल करत आहे, असा आरोप त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित यश मिळालं नाही. आता मात्र वातावरण बदलत आहे. हरियाणात पूर्ण बहुमत मिळाले आहे. त्यामुळे राज्यातही महायुतीला पूर्ण बहुमत मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काँग्रेसने गरीबी हटवली नाही. परंतु मोदी सरकाने १० वर्षातच ३ कोटी लोकांना दारिद्ररेषेबाहेर काढले असे ते म्हणाले. २०२७ पर्यत भारत देश साधनसंपत्तीच्या बाबतीत जगात तिसऱ्या क्रमांकावर असेल असा दावा त्यांनी केला.

# गुजरातधार्जिण्या धोरणांमुळे पाच लाख रोजगार बुडाले; शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांचा आरोप

■ मुंबई : गणेश बागडे

महायुती व विशेषत: भाजपच्या गुजरातधार्जिण्या धोरणांमुळे राज्यातील नियोजित प्रकल्प हलविण्यात आले व त्यातून राज्यातील सुमारे पाच लाख युवकांचे रोजगार बुडाल्याचा आरोप शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी बोलताना केला. तसेच उद्धव ठाकरे बरोबर नसल्यानेच लोकसभा निवडणुकीत भाजपच्या खासदारांचे संख्याबळ २३ वरून ९ पर्यंत घसरल्याचे सांगत टोला लगावला.

राज्यात सत्तांतर होऊन महाविकास आघाडी सत्तेत येणार असल्याचा ठाम विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला. महायुती सरकारची कामगिरी, उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व, मनसेची राजकीय वाटचाल अशा विविध मुद्द्यांवर ठाकरे यांनी मनमोकळेपणाने उत्तरे दिली. लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीला कौल मिळेल. महाराष्ट्र रिकामा करायला निघालेल्या भाजपला राज्यातील जनता रिकामे केल्याशिवाय राहणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेतील रिकाम्या खुर्च्या हे त्याचेच द्योतक होते, असेही आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून राज्यातील प्रस्तावित प्रकल्प गुजरातमध्ये हलविण्यात आले. टाटा-एअरबस प्रकल्प हा राज्यात येणार होता. पण गुजरातमध्ये हलविण्यात आला. या प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बडोद्यात रोड शो करून महाराष्ट्राच्या जखमेवर एक प्रकारे मीठ चोळले. फॉक्सकॉन-वेदान्त प्रकल्प गुजरातमध्ये गेला. तेव्हाही महायुतीचेच सरकार सत्तेत होते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात हे प्रकल्प राज्यात सुरू करण्यासाठी पाठपुरावा झाला होता. आमच्या



सरकारच्या काळात दाव्होसमध्ये करार करण्यात आलेले ९५ टक्के प्रकल्प प्रत्यक्ष सुरू झाले आहेत. याउलट शिंदे सरकारच्या काळात करार झालेले प्रकल्प तर सुरू झाले नाहीतच पण त्याबरोबरच दाव्होस दौऱ्याचे पैसेही या सरकारने थकविले. मुंबईतील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र गुजरातमध्ये हलविण्यात आले. बल्क ड्रग्ज प्रकल्पही राज्याबाहेर गेला. डायमंड बाजार गुजरातमध्ये हलविण्यात आला. मुंबईतील हिरे व्यापाऱ्यांनी गुजरातमध्ये आपला व्यवसाय हलवावा म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यात आला होता, अशी माहितीही ठाकरे यांनी दिली. मुंबई व महाराष्ट्राचे 'अदानीराष्ट्र' करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले आहेत. हा मराठी विरुद्ध गुजराती वाद नाही. तर महाराष्ट्राच्या हक्काचे काढून गुजरातला स्थलांतरित केले जात आहेत. महाराष्ट्रातील पाच लाख रोजगार हे गुजरातमध्ये गेले. प्रकल्प राज्यात सुरू झाले असते तर एवढा रोजगार महाराष्ट्रातील युवकांना मिळाला असता, असेही ठाकरे म्हणाले. बंडखोर आठ आमदारांनी आमच्याकडे उमेदवारी मागितली होती. निवडणुकीचे अर्ज दाखल करण्यापूर्वी आमच्यातून फुटून एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेलेल्या आठ आमदार व दोन मंत्र्यांनी आमच्याकडे उमेदवारी मागितली होती. यातील एका मंत्र्याच्या मतदारसंघात शिंदे यांनीच अगदी कालच सभा घेतली. सरकार पाडल्यावर हिडीसपणे नाच करणाऱ्या आमदारांना आम्ही बरोबर घेतले असते तर बंडखोरांचे पुनर्जीवन केल्यासारखे झाले असते. हे आम्हाला नको होते.

# राज्यात बीएससी नर्सिंगच्या १६०० जागा रिक्त, संस्थात्मक प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

■ मुंबई : राकेश गायकवाड

बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाची नियमित प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यामधील संस्थात्मक कोट्यातील सुमारे १५०० जागा रिक्त राहिल्या आहेत. देशभरातील रिक्त जागांची संख्या लक्षात घेता भारतीय परिचर्या परिषदेने परिचारिका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने बीएस्सी नर्सिंगच्या रिक्त राहिलेल्या संस्थात्मक जागांसाठी दुसरी विशेष फेरी जाहीर केली आहे. ही फेरी १९ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाची संस्थात्मक प्रवेश प्रक्रिया ३१ ऑक्टोबर रोजी संपली. त्यानंतर भारतीय परिचर्या परिषदेने संस्थात्मक स्तरावर रिक्त राहिलेल्या जागा भरण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत अतिरिक्त मुदतवाढ देण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने संस्थात्मक स्तरावरील रिक्त राहिलेल्या जागांसाठी १९ नोव्हेंबरपासून विशेष फेरी जाहीर केली आहे. राज्यामध्ये पाच सरकारी व १७३ खासगी नर्सिंग महाविद्यालये आहेत. सरकारी महाविद्यालयांमध्ये २५० जागा तर खासगी महाविद्यालयांमध्ये ९ हजार २०० जागा आहेत. खासगी महाविद्यालयातील काही जागा संस्थात्मक कोट्यामार्फत भरण्यात येतात.



त्यामुळे संस्थात्मक कोट्यातील जवळपास १५०० जागा रिक्त राहिल्या आहेत. त्याचबरोबर तीन नव्या महाविद्यालयांना भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिल्याने १२० नव्या जागा वाढल्या आहेत. त्यामुळे राज्यातील जवळपास १६२० जागांसाठी ही विशेष फेरी राबवली जाणार आहे.

विशेष फेरीसाठी जागांचा तपशील १८ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर १९ ते २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयांमध्ये जाऊन विहित नमून्यामध्ये अर्ज करायचा आहे. त्यानंतर २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजाता संबंधित नर्सिंग महाविद्यालयांच्या फलकावर आणि संकेतस्थळावर पहिली निवड यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २२ ते २५ नोव्हेंबार रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सर्व कागदपत्रे व शुल्काच्या डीडीसह प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यायचा आहे. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता दुसरी निवड व प्रतीक्षा यादी महाविद्यालयांच्या फलकावर आणि संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. या यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २६ ते २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सर्व कागदपत्रे व शुल्काच्या डीडीसह प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यायचा आहे.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणः आरोपींना आर्थिक मदत करणाऱ्याला अटक

■ मुंबई : यश सावंत

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी अकोला येथून सलमानभाई इकबालभाई वोहरा याला अटक करण्यात आली असून तो गुजरातमधील रहिवासी आहे. वोहराने याप्रकरणातील आरोपींना आर्थिक मदत केल्याचा आरोप आहे.

सलमानभाई इकबालभाई वोहरा हा गुजरातमधील पेतलाड येथील रहिवासी आहे. मुंबईच्या गुन्हे शाखेने त्याला स्थानिक पोलिसांच्या मदतीने अकोला येथील बालापूर येथून अटक केले. गुजरातमधील आनंद नगर येथील त्याच्या बँक खात्यातून या प्रकरणातील अटक आरोपी गुरनैल सिंहचा भाऊ नरेशकुमार सिंह, अटक आरोपी रुपेश मोहोळ, अटक आरोपी हरिशकुमार यांना पैसे




पाठवण्यात आल्याचा आरोप आहे. याशिवाय, त्यांनी इतर व्यक्तींनाही आर्थिक मदत केली आहे. ती रक्कम कटात सहभागी आरोपींनी वापरल्याचा संशय आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे. ही याप्रकरणातील २५ वी अटक आहे. वांद्रे पूर्व येथील खेरनगर परिसरात १२ ऑक्टोबर रोजी रात्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या गुन्हे शाखेने एकूण २४ आरोपींना आतापर्यंत अटक केली आहे. यापूर्वी मुळचा पंजाबमधील फाजिल्का, पक्का चिस्ती गावातील रहिवासी असलेल्या आकाशदीपला बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी गुन्हे शाखेने अटक केली होती. अन्य अटक आरोपींच्या चौकशीत आणि गुन्ह्याच्या तपासात आकाशदीपचे नाव उघड झाले.

# पूल, इमारती म्हणजे विकास नव्हे! सुप्रिया सुळे यांनी पक्षातील फुटिरांना फटकारले

■ मुंबई : सम्यक कासारे

विकासाच्या मुद्द्यावर आम्ही भाजपबरोबर गेलो, असा दावा पक्षातील फुटिरांकडून वारंवार केला जातो. पण विकास म्हणजे फक्त पूल वा इमारती बांधणे एवढेच नसते. सशक्त लोकशाहीत विरोधी पक्षाची जबाबदारी मोठी असते. केवळ खुर्ची, सत्ता मिळाली म्हणजे विकास होतो हा गैरसमज आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी 'लोकसत्ता लोकसंवाद' कार्यक्रमात अजित पवार व त्यांच्या सहकारी आमदारांना फटकारले. तसेच निवडणुकीत महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांची दुरवस्था हे मुख्य मुद्दे असल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादीतील फूट, अजित पवारांचे राजकारण, बारामतीमधील लढत, आई प्रतिभा पवार यांनी प्रचारात उतरणे, लाडकी बहीण योजना अशा अनेक मुद्द्यांवर सुप्रिया सुळे यांनी परखड मते मांडली. 'अजित पवारांपासून पक्षातून बाहेर पडणारे सारे नेते विकासासाठी आम्ही भाजपबरोबर गेलो हा दावा करतात तेव्हा आश्चर्य वाटते. विरोधी पक्षात बसल्यावर विकास होत नाही हे कोणी सांगितले? सत्ता, खुर्ची, मंत्रीपद असा सारा ऐषाराम हवा असतो. लोकशाहीत विरोधकांची भूमिका महत्त्वाची असते हे सारे विसरले असावेत. खुर्ची, सत्ता,



मंत्रीपद मलाच मिळाले पाहिजे. दुसरे कोणी लायक नाही हाच यांचा समज असावा,' असे सुळे यांनी नमूद केले. आपण पक्ष का सोडला याचे उत्तर आमच्या पक्षातून बाहेर पडलेल्या एका नेत्याने पत्रकार राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकात दिले आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. विकासाची नवी संकल्पना आली आहे. सर्वजण म्हणतात, आम्ही विकासासाठी महायुतीत गेलो. असे झाले तर चांगले आहे. प्रत्येक जण विकासासाठी तिकडे गेले असतील तर विकासाचा प्रश्नच संपून जाईल. असे झाल्यास पुन्हा निवडणुकाच होणार नाहीत, अशी भीती सुळे यांनी व्यक्त केली. आपल्या लोकशाहीला ७५ वर्षे झाली आहेत. आताच्या राजकीय आघाड्या खूपच लवचीक झाल्या आहेत. महाराष्ट्रात, बिहारमध्ये हेच दिसून आले आहे. त्यामुळे भविष्यात कुणी कुणासोबतही आघाडी करू शकतो. आता विचारसरणीवर निवडणुका होताना दिसत नाहीत, असे निरीक्षणही त्यांनी नोंदविले.

अजित पवार काका शरद पवारांबरोबर पुन्हा येऊ शकतात, अशी चर्चा प्रचाराच्या काळात रंगली आहे. या प्रश्नावर, हा प्रश्न माझ्याऐवजी 'देवाभाऊ' म्हणून स्वत:ची जाहिरात करणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारा, असा टोला त्यांनी हाणला. दोन पक्ष फोडल्याची फुशारकी हे देवाभाऊ मारतात. देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल माझ्या खूप अपेक्षा होत्या.

# 'पंकजाताई मुंडे तुझे धन्यवाद...', उद्धव ठाकरेंनी केलं कौतुक; म्हणाले, 'तुम्ही महाराष्ट्राच्या डोळ्यावरची पट्टी काढली'

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आज शेवटचा रविवार असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या प्रमुख नेत्यांच्या सभा ठिकठिकाणी आयोजित केल्या होत्या. महाविकास आघआडीकडून मुंबाईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील मैदानावर जाहीर



सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपावर तोफ डागली. 'महायुतीकडून बटेंगे तो कटेंगे घोषणा दिल्या जात आहेत. मी जर मुख्यमंत्री असतो तर यांची अशी हिंमत झाली नसती. पण लक्षात घ्या, मुंबईवर घाला घातला तर 'हम तुम्हे काटेंगे', असे हिंदीत म्हणत उद्धव ठाकरे यांनी महायुतीला इशारा दिला. यावेळी त्यांनी भाजपावर टीका करताना पंकजा मुंडे यांचे आभार मानले.उद्धव ठाकरे भाजपावर टीका करत असताना म्हणाले, 'पंकजा ताई तुझे खूप आभार. तू महाराष्ट्राच्या डोळ्यावरची पट्टी काढलीस. जसे आमच्या चंद्रचूड साहेबांनी न्यायदेवतेच्या डोळयावरची पट्टी सोडून स्वत:च्या डोळयावर बांधली होती. तशी तू महाराष्ट्राच्या डोळयावरची काढली.' उद्धव ठाकरे यांनी पंकजा मुंडे यांच्या एका विधानाचा हवाला दिला. ते म्हणाले, 'पंकजा ताई म्हणाल्या की, भाजपाचे काम खूप भारी आहे. महाराष्ट्रात ९० हजार बुथ आहेत. प्रत्येक बुथवर भाजपाचे दक्षता पथक आहे. या पथकात जर दोन माणसे असतील तर त्यांची संख्या १ लाख ८० हजार होते. जर दोन पेक्षा जास्त लोक असतील तर त्या पटीत त्यांची संख्या वाढेल. ही सर्व लोक भाजपाने गुजरातमधून आणली आहेत.'

'भाजपाने ही माणसे आपल्यावर नजर ठेवायला आणली आहेत. ही आज नजर ठेवायला माणसे आणली आहेत. उद्या यांचा आपली मुंबई आणि महाराष्ट्र बळकविण्याचा डाव आहे. हे तर आता फेक नरेटिव्ह नाही ना. कारण हे मी पंकजा मुंडे बोलल्यानंतर बोलत आहे. याचा अर्थ भाजपा इथे पराभूत झालेली आहे. त्यांचे लोक इथे राहिलेले नाहीत. विशेष म्हणजे महाराष्ट्रात राहिलेल्या भाजपाप्रेमींवर भाजपाचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळेच त्यांना परराज्यातून माणसे आणून नजर ठेवावी लागत आहे', अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

# मतदानाच्या दिवशी बेस्ट बसच्या जादा फेऱ्या; दिव्यांग, वृद्ध मतदारांसाठी 'लो फ्लोअर डेक' बस धावणार

■ मुंबई : यश सावंत

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बेस्ट बसच्या जादा फेऱ्यांचे नियोजन करण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेचे आयुक्त, प्रशासक भूषण गगराणी यांनी बेस्ट उपक्रमाला



मतदानाच्या दिवशी जादा बस फेऱ्या चालविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे २० नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजल्यापासून ते रात्री १ वाजेपर्यंत बस सेवा उपलब्ध असणार आहे. तसेच दिव्यांग, वृद्ध मतदारांसाठी 'लो फ्लोअर डेक' बसही उपलब्ध असणार आहे. मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघातील दिव्यांग, वयवर्षे ८५ पेक्षा अधिक ज्येष्ठ मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहचता यावे यासाठी बेस्ट उपक्रमाची बस सेवा सज्ज असणार आहे. या सेवेसाठी मतदारांना कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. तसेच ही सेवा मुंबई शहरांसह दोन्ही उपनगरांत उपलब्ध असणार आहे. तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांना वेळेवर कर्तव्यावर पोहचता यावे यासाठी जादा बेस्ट सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे. बेस्ट बससह मेट्रो, मध्य आणि पश्चिम रेल्वेची सेवा उशीरापर्यंत उपलब्ध करण्यात येणार आहे. दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आणि निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी जादा बस फेऱ्यांचे नियोजन सोमवारपर्यंत केले जाईल, असे बेस्ट उपक्रमाच्या जनसंपर्क विभागाकडून सांगण्यात आले.

# सूक्ष्म निरीक्षणातून मानवी भावभावनांचा वेध घेणारे लेखक म्हणजे जयवंत दळवी; 'द मुंबई लिटरेचर लाईव्ह फेस्टिव्हल'मध्ये कलाकारांचे मत

■ मुंबई : प्रतिनिधी

प्रसिद्ध दिवंगत लेखक जयवंत दळवी यांची कल्पनाशक्ती विलक्षण झेप घ्यायची. साहित्यक्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. एखाद्या कलाकृतीच्या कथानकापेक्षा त्यांनी पात्रांवर अधिक भर दिला आणि सूसूक्ष्म निरीक्षणातून मानवी भावभावनांचा वेध घेणारे लेखन केले. 'द मुंबई लिटरेचर लाईव्ह फेस्टिव्हल'मध्ये प्रसिद्ध साहित्यिक दिवंगत जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'स्मृतिजागर मनस्वी व्यक्तिमत्त्वाचा' या विशेष कार्यक्रमाचे नरिमन पॉईंट येथील 'एनसीपीए'मध्ये आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जयवंत दळवी यांची नाटके आणि अन्य साहित्यावर आधारित गप्पांमध्ये ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी, स्वाती चिटणीस, ज्येष्ठ अभिनेते प्रदीप वेलणकर, शैलेश दातार सहभागी झाले होते. लेखक – दिग्दर्शक




प्राजक्त देशमुख यांनी त्यांच्याशी संवाद झाला. तर नाट्यलेखक, समीक्षक राजीव नाईक हे मुख्य सूत्रधाराच्या भूमिकेत होते. यावेळी जयवंत दळवी लिखित 'बॅरिस्टर' व 'नातीगोती' या नाटकांतील काही भागांचे अभिवाचन करून आठवणींना उजाळा देण्यात आला. तसेच निवडक 'ठणठणपाळ'चे वाचनही करण्यात आले. तसेच 'जयवंत दळवी – व्यक्ती आणि लेखक' या विशेष पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले. 'मराठी साहित्यविश्वात अनेक दिग्गज लेखक आहेत आणि होऊन गेले. परंतु हे सर्व दिग्गज लेखक आंतरराष्ट्रीय दर्जाचे असूनही मराठी वाचकांपुरतेच मर्यादित राहिले. जयवंत दळवी हे थोर साहित्यिक असून त्यांनाही आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळणे आवश्यक आहे. हेच जाणून जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'द मुंबई लिटरेचर लाईव्ह फेस्टिव्हल'मध्ये 'स्मृतिजागर मनस्वी व्यक्तिमत्त्वाचा' या कार्यक्रमाचे आयोजन केले', असे मत ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी प्रास्ताविकातून व्यक्त केले. 'जयवंत दळवी यांच्या नाटकातील विनोदाची पद्धत वेगळी होती. त्यांच्या नाटकातील विनोद हे खळखळून हसवण्याऐवजी मर्म विनोद होते. सुरुवातीला प्रेक्षक त्या विनोदाचा आनंद घ्यायचे, मात्र नंतर सखोल विचार करायचे. 'बॅरिस्टर'मधील राधाक्का सुरूवातीला गोंडस वाटायची, मात्र शेवटाला ते पात्र गंभीर बनायचे. त्यामुळे सुरुवातीला या व्यक्तिरेखेचा अभ्यास करणे कठीण गेले', असे सुहास जोशी म्हणाल्या.

# ...विकास हाच आमचा अजेंडा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्पष्ट प्रतिपादन

■ मुंबई : गणेश बागडे

'राज्यात आणि केंद्रात एका विचारांचे सरकार असेल तर विकासाला वेग येतो. गेल्या दहा वर्षात राज्यात झालेला विकास हा त्याचा साक्षीदार आहे. महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षाच्या काळात विकासात अनेक गतिरोधक उभे केले गेले. हे गतिरोधक आम्ही दूर केले,' असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'लोकसत्ता'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत केला. 'बटेंगे तो कटेंगे'बाबत विचारणा केली असता, 'निवडणुकीच्या प्रचारात वेगवेगळे मुद्दे पुढे आले असले तरी इतर कोणत्याही विषयापेक्षा विकास हाच आमचा अजेंडा आहे' असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी केले.

विधानसभा निवडणुकांचा प्रचार संपण्यास काही तासांचा कालावधी शिलूक असताना 'लोकसत्ता'ला दिलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आले तर 'मुंबई आणि महाराष्ट्राचे महत्त्व वाढेल' असा दावाही केला. मुंबई हे देशाचे आर्थिक केंद्र आहे. त्यामुळे त्याच्या विकासासाठी हात आखडता घेणार नाही अशी ग्वाही खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. तसेच देशाला महासत्ता करण्यासाठी महाराष्ट्राला देशाचे नेतृत्व करायचे आहे असेही पंतप्रधान म्हणाले आहेत. त्यामुळे केंद्राशी, पंतप्रधानांशी अबोला धरणारे हेकेखोर सरकार हवे की पंतप्रधानांच्या हातात हात घालून राज्याला विकासपर्वाकडे नेणारे महायुतीचे सरकार हवे याचा निर्णय राज्यातील सुजाण जनतेने यापूर्वीच घेतला असून निकालात तुम्हाला या निर्णयाचे प्रतिबिंब उमटलेले दिसेल असेही मुख्यमंत्री म्हणाले. या निवडणुकीच्या प्रचारात



'बटेंगे तो कटेंगे' स्वरूपाचा प्रचार मोठ्या प्रमाणात दिसत आहे. या आखणीचा नेमका उद्देश काय, असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री म्हणाले,'आम्ही विकास आणि लोककल्याणाचा अजेंडा घेऊनच मतदारांना सामोरे जात आहोत. राज्यात नवे उद्योग यावेत, रोजगारनिर्मिती व्हावी, अर्थव्यवस्थेला चालना मिळावी यासाठी गेल्या दोन वर्षात आमच्या सरकारने भरीव काम केले आहे. माविआचे अडीच वर्षातील सरकार विकास विरोधी आणि महाराष्ट्र विरोधी होते. त्यांनी विकास प्रकल्पांमध्ये टाकलेले गतीरोधक आम्ही उखडून टाकले आणि विकासाला गती दिली. आम्हाला दोन वर्षांचा कमी काळ मिळाला असला तरी गेल्या दहा वर्षात झाले नसेल एवढे काम आम्ही करून दाखवले. अनेक आघाड्यांवर दुसऱ्या-तिसऱ्या क्रमांकावर गेलेल्या महाराष्ट्राला पुन्हा क्रमांक एक वर आणण्याचे काम आम्ही केले आहे. आणखी खूप करायचे आहे. महाराष्ट्रातील जनता आमच्या कामावर खूश आहे. त्यामुळे निवडणुकांसाठी दुसऱ्या कुठल्याही अजेंड्यांची आम्हाला गरज नाही. विकासाच्या अजेंड्यावरच पुन्हा महायुतीचे सरकार येणार हे मी तुम्हाला छातीठोकपणे सांगतो.' केंद्र आणि राज्यात एकाच विचारसरणीचे सरकार असले तरच राज्याच्या विकासाला गती प्राप्त होते हे जनतेने अनुभवले आहे.

# गर्भधारणेच्या वेळी महिलांना मधुमेहाचा धोका

■ **मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत बदलती जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयी, ताणतणावांमुळे गर्भधारणेच्या वेळी महिलांना मधुमेहाचे प्रमाण वाढल्याचे कामा रुग्णालयाने केलेल्या एका अभ्यासात आढळले आहे.

गर्भधारणेच्या वेळी महिलांमध्ये मधुमेहाची सामान्य लक्षणे दिसून येत नाहीत. हार्मोन बदलांमुळे मधुमेह होतो. शरीर अन्नाचे ऊर्जेत रूपांतरित करते. इन्सुलिन संप्रेरक अन्नातून साखर नियंत्रित ठेवण्याचे काम करतो. इन्सुलिन योग्य काम करीत नसल्यास वा शरीरात पुरेसे इन्सुलिन नसल्यास रक्तात मोठ्या प्रमाणात साखर तयार होते गर्भधारणेच्या वेळी नाळेतील हार्मोन्स इन्सुलिनच्या कार्यपद्धतीत व्यत्यय आणतात. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अनियंत्रित होऊन मधुमेह जडतो. गर्भधारणेच्या २४ ते २८ आठवड्यांदरम्यान मधुमेह झाल्याचे लक्षात येते. गेली दोन वर्षे महिलांसाठी विशेष रुग्णालय असलेल्या कामा रुग्णालयात गर्भधारणेच्या वेळी होणाऱ्या मधुमेहाबाबत अभ्यास करण्यात येत आहे. त्यात गर्भावस्थेतील महिलांना मधुमेह होत असल्याचे निदर्शनास आले आहे. गर्भधारणेच्या वेळी नाळेतील हार्मोन्स इन्सुलिनच्या कार्यपद्धतीत व्यत्यय आणतात. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अनियंत्रित होऊन मधुमेह जडतो, असे कामा रुग्णालयाने केलेल्या एका अभ्यासात आढळले आहे.




गर्भधारणेदरम्यान मधुमेह झाल्यास बाळामध्ये जन्मतः हृदयदोष, अपरिपक्व फुप्फुसे, जास्त लाल रक्तपेशी निर्माण होऊन रक्तवाहिन्या आतड्यांमध्ये अडथळा होतो, बाळ लठ्ठ असणे, मुलाला फेफरे येणे, अकाली जन्म, बाळाला टाइप २ चा मधुमेह होण्याचा धोका असतो. गेल्या दोन वर्षांत कामा रुग्णालयात महिलांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान गर्भवतींना मधुमेह झाल्याचे निदर्शनास आले. या महिलांची सखोल वैद्यकीय तपासणी केली असता गरोदरपणातील संप्रेरके बदलांसह त्यांची जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयी, व्यायामाचा अभाव, मानसिक ताणतणावामुळे मधुमेहाच्या प्रमाणात वाढत झाल्याचे निदर्शनास आले आहे. या महिलांची अधिक तपासणी केली असता त्यांची जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयी, व्यायामाचा अभाव, मानसिक ताणतणावामुळे त्यांना गर्भधारणेदरम्यान मधुमेह झाल्याचे निदर्शनास आले. गर्भधारणेदरम्यान कोणालाही मधुमेह होऊ शकतो. मात्र हृदयरोग, उच्च रक्तदाब, गर्भधारणेपूर्वी लठ्ठपणा किंवा अधिक वजन, टाइप-२ मधुमेहाचा कौटुंबिक इतिहास असलेल्या महिलांना गर्भधारणेदरम्यान मधुमेह होण्याची शक्यता अधिक असते.

## शेतीमालाला हमीभाव नाहीच, जाणून घ्या, हमीभाव किती, मिळणारा दर किती

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

केंद्र सरकारने खरीप शेतीमालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी विविध योजनांची घोषणा केली असली तरीही सद्यस्थितीत खरीपातील शेतीमालाला हमीभाव मिळत नसल्याचे चित्र आहे. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर खरीप हंगामातील शेतीमालाची नाफेड, एनसीसीएफकडून हमीभावाने खरेदी करण्याची घोषणा केली होती. त्या शिवाय भावांतर योजनाही जाहीर केली होती. तरीही सद्यस्थितीत राज्यात उडीद वगळता एकाही शेतीमालाला हमीभावा इतका दर मिळत नसल्याचे चित्र आहे. नाफेड आणि एनसीसीएफकडून होणाऱ्या खरेदीला अद्याप गतीच आलेली नाही. राज्यात खरीप हंगामातील सोयाबीनचे क्षेत्र सुमारे ५० लाख हेक्टर आहे. विदर्भ, मराठवाड्यात सोयाबीन मोठ्या प्रमाणावर होते.



सोयाबीनचा हमीभाव ४८९२ रुपये आहे. पण, हंगामात सोयाबीनला ४४०० पेक्षा जास्त दर मिळालेला नाही. शुक्रवारी (१५ नोव्हेंबर) सोयाबीनला सरासरी ४३४५ रुपये प्रतीक्विंटल दर मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस यांनी सोयाबीनचा हमीभाव सहा हजार रूपये प्रतिक्विंटल करण्याची घोषणा केली. शिवाय केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सोयाबीन खरेदीचे निकष बदलून ओलाव्याचे प्रमाण १२ टक्क्यांऐवजी १५ टक्के केले. तरीही सोयाबीनला हमीभाव मिळत नाही. सोयाबीन बाबत केंद्राचे धोरण सपशेल फसले आहेत. कापसाची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. मध्यम लांबीच्या धाग्याच्या कापसाला ७१२१ आणि लांब धाग्याच्या कापसाला ७५२१ रुपये प्रतिक्विंटल हमीभाव आहे. पण, बाजारात कापूस पाच हजार ते सहा हजार रुपयांवर आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यात कमी दरामुळे शेतकऱ्यांनी कापूस विक्री थांबविली आहे. मुगाला ८६८२ रुपये प्रतिक्विंटल हमीभाव आहे. पण, शेतकऱ्यांना जेमतेम ६९२६ रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. यंदा उडीद पिकांची पेरणी कमी झाली होती. बाजारात नवे उडीद अत्यंत कमी प्रमाणावर येत आहे. दिलासादायक बाब इतकीच की उडदाचा हमीभाव ८११३ रुपये प्रतिक्विंटल असून, सध्या मिळणारा दर ८५०० रुपये आहे. इथेनॉल निर्मितीसाठी मक्याचा वापर वाढल्यामुळे मका तेजीत होता. पण, सध्या मक्याला प्रतिक्विंटल २००० ते २१०० रुपये दर मिळत आहे. मक्याचा हमीभाव २२२५ रुपये प्रतिक्विंटल आहे.

## चेंबूरमधील अपक्ष उमेदवार सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

उमेदवारी अर्जावर अनुमोदकाची स्वाक्षरी नसल्याने चेंबूरमधील एका अपक्ष उमेदवाराचा उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी रद्द केला आहे. याप्रकरणी अपक्ष उमेदवाराने मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली होती. मात्र उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. दरम्यान, आता या अपक्ष उमेदवाराने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. आशिष गडकरी यांनी अपक्ष उमेदवार म्हणून चेंबूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी २४ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र अनुमोदकाची स्वाक्षरी नसल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचा उमेदवारी



अर्ज बाद केला. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात त्यांनी दुसऱ्याच दिवशी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने अनुच्छेद २२६ अन्वये न्यायालयाला निवडणूक प्रक्रियेत हस्ताक्षेप करण्याचा अधिकार असला तरी तो फक्त निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यासाठी असून बाधा घालण्यासाठी नसल्याचे स्पष्ट करीत ही याचिका फेटाळली होती. निवडणूक अधिकाऱ्यांनी पडताळणी न करताच आपला उमेदवारी अर्ज स्वीकारला होता. त्यांनी आपल्याला वेळच दिला नाही. हा अन्याय असून निवडणूक लढवण्यासाठी मला पाच वर्षे वाट पहावी लागणार आहे, असा आरोप त्यांनी केला. यासंदर्भात आपण सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती आशिष गडकरी यांनी दिली.

## लोकसभेला २ लाख ३१ मतं घेऊनही पराभूत, अपक्षाचा भाजपला पाठिंबा, एका भेटीने सामना पलटला

■ **मुंबई : विशाल कारंडे**

मुरबाड विधानसभा निवडणुकीत जिजाऊ संघटनेचे निलेश सांबरे यांनी भाजप उमेदवार किसन कथोरे यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. कल्याण तालुक्यातील निंबवली गावात दोन्ही नेत्यांची भेट असून यावेळी आपण कथोरेंच्या पाठीशी असल्याचं निलेश सांबरे यांनी जाहीर केलं. लोकसभा निवडणुकीत भिवंडी मतदारसंघातून निलेश सांबरे अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात होते. त्यांना वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दर्शवला होता. या निवडणुकीत त्यांनी तब्बल २ लाख ३१ हजार मतं घेतली होती, तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बाळ्यामामा म्हात्रे यांनी भाजपचे



केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचा ६६ हजार मतांनी पराभव केला होता. सांबरे यांच्या जिजाऊ संघटनेचा मुरबाड आणि शहापूर भागात मोठा प्रभाव आहे. आता सांबरे यांनी किसन कथोरे यांना थेट पाठिंबा जाहीर केल्यामुळे कथोरेंच्या विजयाचा मार्ग सुकर झाल्याचं बोललं जात आहे. त्यांच्याविरोधात शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे सुभाष पवार आहेत. मुरबाडमध्ये शुक्रवारी पार पडलेल्या बैठकीत जिजाऊ संघटनेने किसन कथोरे यांना विधानसभेसाठी पाठिंबा जाहीर केला. निंबवली गावात प्रचारानिमित्त असलेल्या किसन कथोरे यांची निलेश सांबरे यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी कथोरे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## वर्सोव्यात अल्पसंख्याक मतांवर भवितव्य, भाजपसाठी लढत कठीण

■ **मुंबई : सम्यक कासारे**

वर्सोवा विधानसभा मतदारसंघात गेली दोन वर्षे सलग निवडून आलेल्या भाजपच्या आमदार भारती लव्हेकर यांना यंदा ही निवडणूक जिंकण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांना तब्बल २१,०९० मतांची आघाडी मिळवून देणाऱ्या या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात असलेल्या मुस्लीम मतदारांच्या हाती लव्हेकर यांचे भवितव्य आहे. उद्धव ठाकरे यांनी हारुन खान यांना रिंगणात उतरवून ही जागा आपल्या खिशात पडावी, असा प्रयत्न केला आहे.

२००८ मध्ये झालेल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर हा मतदारसंघ अस्तित्वात आला. २००९ मध्ये ही जागा कॉंग्रेसकडे होती. मात्र, २०१४ मध्ये मोदी लाटेत लव्हेकर चांगल्या मताधिक्याने निवडून आल्या. लव्हेकर या मूळच्या दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या शिवसंग्राम पक्षाच्या. मात्र, २०१४ पासून त्यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविली आणि विजयी ठरल्या. २०१९ च्या निवडणुकीत एकत्रित शिवसेनेच्या राजुल पटेल यांचा अधिकृत अर्ज बाद होऊन त्या अपक्ष उभ्या राहिल्या, हे लव्हेकर यांच्या पथ्यावर पडले. आता मात्र तशी स्थिती नाही. लव्हेकर



यांना लोकसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेली मोठी पिछाडी कमी करण्यासाठी खूपच मेहनत घ्यावी लागणार आहे. 'एमआयएम'चे रईस लष्करिया, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संदेश देसाई आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे बंडखोर राजू पेडणेकर यांच्यात होणाऱ्या मतांच्या विभाजनामुळे लव्हेकर यांना फारसा फायदा होईल, असे वाटत नाही. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे या मतदारसंघात फारसे प्राबल्य नाही. त्यामुळे लव्हेकर या किती मुस्लीम मते मिळवितात, यावर त्यांचे विजयाचे गणित अवलंबून आहे. लव्हेकर यांना यावेळी उमेदवारी मिळेल किंवा नाही, याबाबत शेवटपर्यंत साशंकता होती. अगदी शेवटच्या क्षणी त्यांची उमेदवारी जाहीर झाली. उपविभागप्रमुख असलेल्या हारुन खान यांना अल्पसंख्याक म्हणून उमेदवारीची संधी मिळाली आहे. अल्पसंख्याकांची किती मते घेण्यात त्यांना यश येते, यावर विजयाचे गणित अवलंबून आहे. या मतदारसंघात एक लाख सहा हजार (३८ टक्के) मुस्लिम, ६५ हजार (२३ टक्के) उत्तर भारतीय आणि त्या खालोखाल ५७ हजार (२० टक्के) मराठी, २२ हजार ७०० (आठ टक्के) गुजराती-मारवाडी, १४ हजार ६०० (पाच टक्के) दक्षिण भारतीय या मतदारांवर उमेदवारांची भिस्त आहे.

# भाजपच्या मानगुटीवर मुस्लीम भयाचे भूत

लाडकी बहीण योजनेने सत्ताधारी महायुतीला विधानसभा निवडणुकीत बऱ्यापैकी सावरले असले तरी मुस्लीम समाजाने महाविकास आघाडीच्या बाजूने राहण्याचा निर्णय घेतल्यामुळे महायुतीचे नेते अस्वस्थ झालेले आहेत. केवळ मुस्लीम मतदार आपल्याजवळ नसल्याने सत्तेचा हातातोंडाशी आलेला घास गमवावा लागू शकतो, याची कल्पना महायुतीला विशेषतः भाजप श्रेष्ठींना आली आहे. म्हणूनच आता मुस्लीम मतदारांच्या एकजुटीला आव्हान देण्यासाठी भाजपने हिंदू मतदारांचे एकत्रिकरण सुरू केले आहे.

याच पार्श्वभूमीवर योगी आदित्यनाथ यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठिकठिकाणच्या सभेत 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है' चा नारा दिला. नरेंद्र मोदी हे कुठल्या एका धर्माचे नव्हे तर देशाचे पंतप्रधान आणि योगी आदित्यनाथ हेदेखील संविधानिक पदावर आहेत. त्यामुळे या दोघांनी अशी वक्तव्ये करावीत का, हादेखील वादाचा मुद्दा आहे. मात्र या विधानांना भाजपमधूनच विरोध सुरू झाला आहे.

ज्यांना सर्वच धर्मियांची मते मिळतात, त्या पंकजा मुंडे यांनी या विधानांना स्पष्टपणे विरोध केला आहे. महाराष्ट्रात असे मुद्दे आणायची गरजच नाही, अशीही भूमिका त्यांनी मांडली आहे. खरे तर, महाराष्ट्रातील काही ठराविक मतदारसंघांमध्ये मुस्लीम मतदार निर्णायक भूमिका बजावत असतात. अशा ठिकाणी मुस्लीम समाजाने एकत्र येऊन एकगठ्ठा मतदान केल्यास, त्याचा थेट फायदा महाविकास आघाडीला होतो, हे लोकसभा निवडणुकीत स्पष्ट झाले आहे.

धुळे लोकसभा



निवडणुकीत तर पाच विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे पुढे होते, मात्र मुस्लीमबहुल असलेल्या मालेगाव विधानसभा मतदारसंघाने डॉ. भामरेंच्या तोंडाशी आलेला विजयाचा घास हिरावून घेतला आणि या मतदारसंघात महाविकास आघाडीच्या डॉ. शोभा बच्छाव यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली. याशिवाय अन्य अनेक ठिकाणी मुस्लीम मतदारांचा फटका भाजपसह महायुतीला बसला. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कृत्याला 'व्होट जिहाद' असे संबोधले आहे.

मुस्लीम समाजाच्या मशिदींमध्ये महाविकास आघाडीला मत देण्याचे फतवे निघाले आहेत, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. इतकेच नाही तर, मतदानाच्या दिवशी जेथे नियोजित विवाह वा अन्य कार्यक्रम होते तेदेखील काही दिवसांसाठी पुढे ढकलण्यात आले आहेत, अशी फडणवीसांची माहिती आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत, मुस्लीम मतदार जर पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या उमेदवारांना समर्थन देऊ लागले, तर त्याचा भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

विशेषतः शहरी भागांमध्ये, जिथे कॉंग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेना (उद्धव गट) महाविकास आघाडीचा जोर अधिक आहे, अशा ठिकाणी मुस्लीम मतदार निर्णायक ठरू शकतात. भाजपसाठी महाराष्ट्रातील काही भागांत मुस्लीम समाजाचे ध्रुवीकरण मोठे आव्हान ठरते. मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे आणि विदर्भातील काही शहरी आणि निमशहरी भागांमध्ये मुस्लीम मतदार निर्णायक ठरतात. जर मुस्लीम समाजाने महाविकास आघाडीला पाठिंबा दिला, तर भाजपचे गणित कोलमडू शकते.

त्यासाठीच मोदींना हिंदू मतदारांना एकत्र आणण्यासाठी बटेंगे तो कटेंगेचे आवाहन करावे लागत आहे. याचा उद्देश स्पष्ट आहे. मुस्लीम समाजाच्या एकजुटीला हिंदू मतदारांच्या अधिक मोठ्या एकजुटीने प्रत्युत्तर देणे. या वक्तव्यातून हिंदू मतदारांना संबोधित करण्याचा हेतू दिसून येतो. हिंदू समाज अनेक जाती, पोटजाती आणि सांस्कृतिक गटांमध्ये विभागलेला आहे.

मात्र, भाजपच्या राजकारणातील एक प्रमुख ध्येय हिंदू मतदारांची जातीय भेदभाव न करता एकजूट साधणे हे आहे. भाजपला ठाऊक आहे की, मुस्लीम समाजाच्या एकगठ्ठा मतदानामुळे महाविकास आघाडीला वाढत चाललेल्या पाठिंब्याला उत्तर म्हणून हिंदू मतदारांची एकजूट हाच प्रभावी मार्ग ठरू शकतो. या ध्येयासाठी 'एक है तो सेफ है' ही कल्पना पुढे केली जात आहे.

ध्रुवीकरण हे भारतीय राजकारणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. १९८० च्या दशकापासून बाबरी मशीद-रामजन्मभूमी विवाद, गुजरातचे २००२ मधील दंगे आणि त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये धर्माच्या आधारावर मतांचे ध्रुवीकरण होत आले आहे. बटेंगे तो कटेंगे हे विधान हा ध्रुवीकरणाच्या प्रयत्नाचा भाग आहे. हिंदू मतदारांना 'धर्माच्या आधारावर एकत्र राहिल्यानेच सुरक्षितता आणि स्थैर्य मिळेल', हा संदेश देणे, ही या घोषणेमागील कल्पना आहे.

मोदींनी या विधानातून मुस्लीम समाजाच्या एकगठ्ठा मतदानावर अप्रत्यक्षरित्या टीका केली आहे आणि हिंदू मतदारांना त्याचा प्रतिकार करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. त्याचा परिणामही आता वेगवेगळ्या मतदारसंघात दिसत आहे. आजवर भाजपला नाकारणारे मतदारही मुस्लिमांनी ठरवलेला आमदार नको म्हणून एकत्र येत आहेत. महाराष्ट्रातील हिंदू समाज अनेक जातीय विभागांमध्ये विभागलेला आहे. मराठा, ओबीसी, दलित, वंजारी, धनगर आणि इतर. भाजपला माहिती आहे की, या गटांमध्ये एकता नसेल, तर मुस्लीम मतदारांचा प्रभाव अधिक तीव्र होईल.

'एक है तो सेफ है' या विधानातून भाजप हिंदू समाजातील जातीभेद दूर करून एकत्र येण्याचे आवाहन करत आहे, मात्र यामुळे निवडणुकीचे स्वरूप अधिक तीव्र आणि धार्मिक रंगाने रंगण्याची शक्यता आहे. भारतासारख्या बहुविध देशात, अशा रणनीतींमुळे सामाजिक सलोख्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. तरीही, निवडणुकीतील राजकीय समीकरणे या घोषणेमुळे कशी बदलतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## वाजपेयींचा कित्ता गिरवा

क्रीडा आणि राजकारण ही खरे तर दोन वेगळी क्षेत्रे. मात्र, राजकारण सर्व क्षेत्रांना व्यापणारे असते आणि क्रीडा क्षेत्रही त्याला अपवाद नाही. खेळात राजकारण असते; परंतु खेळाच्या मैदानातूनही राजकीय डावपेच लढविले जात असतात. हे केवळ स्थानिक किंवा राष्ट्रीय राजकारणापुरतेच मर्यादित नाही; तर आंतरराष्ट्रीय राजकारणासाठीही लागू पडणारे आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात क्रिकेटवरून सध्या सुरू असलेली चर्चा ही अशा प्रकारे खेळ आणि राजकारण या दोहोंना व्यापणारी आहे.



दोन्ही देशांत क्रिकेट हा काही राष्ट्रीय खेळ नाही; परंतु दोन्हीकडे तो सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. मात्र, हे दोन संघ क्वचितच आमने सामने येतात; कारण सध्या ते परस्परांशी खेळत नाहीत. विश्व करंडक, आशिया करंडक किंवा 'चॅम्पियन्स करंडक' यांसारख्या 'आंतरराष्ट्रीय क्रिकेट कौन्सिल'च्या (आयसीसी) स्पर्धांमध्येच ते एकमेकांच्या विरोधात खेळतात. दोहोंमधील क्रिकेटचे संबंध या गोठणबिंदूपर्यंत येण्याचे कारण आहे, ते पाकिस्तानच्या भारतविरोधी कारवाया. भारतविरोधी दहशतवाद्यांना सर्व प्रकारची मदत पाकिस्तान करीत असून, त्यांच्याद्वारे त्याने भारतात छुपे युद्ध छेडले आहे. हा दुटप्पीपणा थांबवावा, यासाठी भारताने त्याच्याबरोबरील सर्व संबंध किमान पातळीवर आणले आहेत. दहशतवाद आणि शांततेच्या वाटाघाटी एकाच वेळी होऊ शकत नाहीत, ही भारताची यामागील भूमिका आहे. पाकिस्तानचे आजवरचे वर्तन पाहता ती चुकीची म्हणता येणार नाही.

म्हणूनच, पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाला पाकिस्तानात न पाठविण्याची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) भूमिका तर्कसंगत ठरते. मात्र, पाकिस्तानबाबतचे धोरण आणि खेळ यांमध्ये सरमिसळ करावी काय, असा प्रश्न यातून उपस्थित होतो. खरे तर आत्ताच हा प्रश्न उपस्थित होण्याचे कारण नाही; गेल्या दहा वर्षांपासून दोन्ही देशांमधील क्रिकेट ठप्प आहे. त्याच्याही आधी, कारगिल युद्धानंतर काही वर्षे दोन्ही संघांत सामने होत नव्हते. सन १९६५च्या युद्धानंतरही बराच काळ दोन्ही देश क्रिकेट सामन्यांत एकमेकांसमोर आलेले नव्हते. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांमधील चढ-उताराचा फटका दोहोंतील क्रिकेटला अशा प्रकारे नेहमीच बसत आला आहे. दोन्ही देशांच्या संबंधांत काहीशी सुधारणा झाली की दोहोंत बंद असलेले क्रिकेट पुन्हा सुरू होते, असा अनुभव आहे.

यावेळी मात्र अद्याप संबंधांतील सुधारणा दृष्टिपथात नाही; कारण पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद थांबलेला नाही. काश्मीर खोरे तुलनेने शांत असले, तरी गेल्या काही वर्षांत जम्मू भागातील दहशतवादी हल्ले वाढलेले आहेत. या हल्ल्यांचे कट पाकिस्तानात शिजले आहेत. मुंबईवरील २६/११च्या हल्ल्याचे सूत्रधार पाकिस्तान खुलेआम फिरत आहेत. जम्मू-काश्मीरसाठी लागू असलेले ३७०वे कलम रद्द केल्यानंतर पाकिस्ताने मोठा कांगावा केला आणि दोन्ही देशांतील व्यापारी संबंध एकतर्फी थांबविले; ते अद्याप सुरू झालेले नाहीत. या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट संघाने पाकिस्तानाचा दौरा न करणे हे आतापर्यंतच्या धोरणाला पूरकच ठरते. मात्र, भारताने तसे करावे काय? 'चॅम्पियन्स करंडक' ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा आहे. पाकिस्तानात दहशतवाद उफाळून आल्यापासून तिथे गेल्या २५ वर्षांत एकही आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा भरलेली नाही. आपल्या देशातील दहशतवाद आटोक्यात आला असून, तिथे आता सामान्य परिस्थिती आहे, हे सांगण्यासाठी पाकिस्तानला ही स्पर्धा यशस्वी होणे फार महत्त्वाचे आहे. एकूण आठ देश या स्पर्धेत सहभागी होणार आहेत; परंतु भारताचा सहभाग सर्वांत महत्त्वाचा ठरतो. एकतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सध्या भारतीय संघाचा दबदबा वाढला आहे. रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह हे खेळाडू केवळ भारतातच नव्हे, तर पाकिस्तानातही प्रचंड लोकप्रिय आहेत.

# लॉटरी किंगविरोधात EDची मोठी कारवाई! कार्यालयावर छापेमारी ८.८ कोटी रक्कम जप्त

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

केंद्र सरकारची तपास संस्था ईडी (एन्फोर्समेंट डायरेक्टरेट) ने देशाच्या लॉटरी किंग विरुद्ध मोठी कारवाई केली आहे. लॉटरी किंग सँटियागो मार्टिनच्या चेन्नईतील कार्यालयावर छापा टाकला आहे. ईडीने मार्टिनच्या कार्यालयातून ८.८ कोटी रुपये जप्त केले आहेत. मार्टिनवर ९०० कोटींहून अधिक रुपयांच्या मनी लॉड्रिंगचा आरोप आहे. मार्टिनवर लॉटरी विकून आणि वाटप करून गैरफायदा मिळवल्याचा आरोप आहे. गुरुवारी हा छापा टाकण्यात आला. ईडीने चेन्नई आणि कोईम्बतूरमधील मार्टिन आणि त्याच्या कुटुंबाच्या २० हून अधिक ठिकाणांवर छापे टाकले. फरीदाबाद, लुधियाना आणि कोलकाता येथील मार्टिनच्या साथीदारांच्या ठिकाणांवरही छापे टाकण्यात आले. विविध राज्यांमध्ये विकल्या जाणाऱ्या लॉटरीमधून मार्टिनच्या माध्यमातून कमावलेल्या पैशाची ईडी चौकशी करत आहे. मार्टिनची कंपनी फ्यूचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिसेस (पी) लिमिटेडवर सिक्कीम राज्य लॉटरीच्या वितरणात फसवणूक केल्याचा आरोप आहे. यापूर्वी गेल्या वर्षी मे महिन्यात ईडीने मार्टिन आणि त्याच्या साथीदारांच्या घरावर छापे टाकले होते. त्यानंतर ईडीने ४५७ कोटी रुपयांहून अधिक संपत्ती जप्त केली होती. यातील १५८ कोटी रुपये मुदत ठेवी आणि म्युच्युअल फंडात असून २९९ कोटी रुपयांची मालमत्ता होती. मार्टिन हे भारतातील सर्वात मोठ्या राजकीय देणगीदारांपैकी एक आहेत. मार्टिन यांनी ३ख सह सर्व



पक्षांना इलेक्टोरल बॉडद्वारे १३६८ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. हा तपास अशा वेळी होत आहे जेव्हा मद्रास उच्च न्यायालयाने काही आठवड्यांपूर्वी पीएमएलए (प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉडरिंग अॅक्ट) अंतर्गत ईडीच्या खटल्यावर शिक्कामोर्तब केले होते. सिक्कीम लॉटरीची मुख्य वितरक मार्टिनची कंपनी फ्यूचर 'गेमिंग सोल्यूशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' आहे. विशेष बाब म्हणजे ईडी २०१९ पासून मार्टिनविरोधात चौकशी करत आहे. काही महिन्यांपूर्वी जेव्हा इलेक्टोरल बॉड्स खरेदीचा डेटा समोर आला तेव्हा मार्टिनने २०१९ ते २०२४ दरम्यान राजकीय पक्षांना १३०० कोटी रुपयांची देणगी दिल्याचे समोर आले होते. मार्टिनची कंपनी इलेक्टोरल बॉड्स खरेदी करणारी सर्वात मोठी कंपनी होती. मार्टिनबद्दल असे म्हटले जाते की त्याने लॉटरीद्वारे ऑनलाइन गेमिंग व्यवसाय सुरू केला. यानंतर ते ऑल इंडिया फेडरेशन ऑफ लॉटरी ट्रेड अँड अलाईड इंडस्ट्रीजचे अध्यक्षही झाले. त्यांनी फ्यूचर गेमिंग सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन केली आणि लॉटरी व्यतिरिक्त, त्यांनी ऑनलाइन गेमिंग व्यवसाय देखील सुरू केला. हळूहळू त्याने कॅसिनो आणि स्पोर्ट्स बेटिंगमध्येही प्रवेश केल्याचे सांगितले जाते. त्यांची कंपनी स्टॉक एक्स्चेंजमध्ये सूचिबद्धही नाही.

## मिरा रोड मध्ये ५० लाखांच्या बनावट नोटा जप्त; गुजरातमधील तरुणाला अटक

■ **वसई : विशेष प्रतिनिधी**

मिरा रोड मधून मध्यवर्ती गुन्हे शाखेने पन्नास लाखांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी गुजरात मधील एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. या नोटा कुठे छापल्या आणि कुठे वितरित केल्या जाणार होत्या, त्याचा पोलीस शोध घेत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. काळ्या पैशांच्या देवाण-घेवाणीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. शनिवारी काशिमिरा येथे एक तरुण बनावट नोटा विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी डॉन बॉस्को शाळेजवळ असलेल्या मुन्शी कंपाउंड येथे सापळा लावून आर्यन जाबूचा (१९) या तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेल्या बॅगेत ५३ नोटांची बंडले आढळली. त्या एकूण ५१ लाख ७१ हजारांच्या नोटा आढळून आल्या. हा तरुण मूळ गुजरात राज्यातील भावनगर येथे



राहणारा आहे. त्याने या बनावट नोटा कुठून आणल्या आणि कुणाला वितरित करणार होत्या याचा आम्ही तपास करत आहोत, अशी माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी दिली. या आरोपीने ठाण्यातील एका व्यक्तीने या नोटा विक्रीसाठी दिल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलीस त्याच्या दाव्याची पडताळणी करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून हा तरुण शहरात विक्री साठी आला होता. मात्र या बनावट नोटांच्या निवडणुकीशी संबध नसल्याचे राख यांनी सांगितले. ही कारवाई पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती मुन्हे प्रकटीकरण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख, पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोलीस उपनिरीक्षक हितेन्द्र विचारे आदींच्या पथकाने केली.

## पुणे पोलिसांची मोठी कारवाई; नाकाबंदीत तब्बल 'इतक्या' कोटींचे सोने, चांदी जप्त

■ **पुणे: विशेष प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत स्थिर पथकांच्या नाकाबंदीत मुंबईहून पुण्यातील सराफ व्यावसायिकांना पाठविलेले ४ कोटी १६ लाख रुपयांची ४ किलो चांदी तसेच १ कोटी ५७ लाख रुपयांचे दोन किलो सोने असा ऐवज जप्त केला आहे. पोलिसांनी याबाबतची माहिती प्राप्तीकर विभाग वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागातील अधिकाऱ्यांना दिली असून, त्यांच्याकडून याबाबत तपासणी केली जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या वेगवेगळ्या भागात नाकाबंदी लावण्यात आली आहे. औंध येथील राजीव गांधी पुलावरुन शनिवारी सकाळी १ वाहन पुण्याकडे निघाले होते. नाकाबंदीतील पोलिसांनी वाहन तपासणीस अडवले. तपासणी केली असता त्यात ४ किलो ४७९ ग्रॅम चांदी आणि २ किलो ५११ ग्रॅम सोने सापडले. जप्त केलेल्या सोन्या चांदीचे किंमत पावणेसहा कोटी रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी चौकशीसाठी एकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून जप्त करण्यात



आलेले सोने आणि चांदी शहरातील सराफ व्यावसायिकांना देण्यात येणार होते. याप्रकरणी प्राप्तीकर विभाग, तसेच वस्तू आणि सेवा कर विभागातील अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात येत आहे. एका कुरिअर कंपनीमार्फत पुणे, कोल्हापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर येथील सराफ व्यावसायिकांना सोने, चांदी पोहचिवण्यात येणार असल्याची माहिती चौकशीत मिळाली आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची नोंद चतु:श्रृंगी पोलिसांत केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून शहर, परिसरात गस्त वाढविली आहे. पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीत सहकारनगर भागातून तब्बल १२८ कोटी रुपयांचे सोने नुकतेच जप्त केले होते. तेही सोने शहरातील सराफ व्यावसायिकांचे होते. त्यांनी मुंबईतील कारागिरांकडून सोन्याचे दागिने घडवून आणले होते.

## मानखुर्द येथे चांदीचा ट्रक अडवला, ८० कोटींची आठ हजार ४७६ किलो वजनाची चांदी जप्त

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

येत्या बुधवारी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली आहे. या नाकाबंदीदरम्यान मानखुर्द पोलिसांनी शनिवारी वाशी चेकनाका परिसरात चेन्नईहून येणारा एक ट्रक अडवला. या ट्रकच्या तपासणीत आठ हजार ४७६ किलो वजनाची चांदी सापडली असून त्याची तिची किंमत ८० कोटी रुपये असल्याचे म्हटले जात आहे. ट्रकच्या तपासणीत आढळून आलेली चांदी ही हाँगकाँग येथून चेन्नई येथील कंपनीच्या कार्यालयात आणण्यात आली होती. तेथून ती मुंबईत आणण्यात येत होती. घटना उघडकीस आल्यानंतर प्राप्तिकर विभागाचे अधिकारी तसेच अणुशक्ती नगर मतदार संघ १७२ येथील भरारी पथकाला पाचारण करण्यात आले असून ते याप्रकरणी तपास करत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्याकरिता त्यांना पैसा, भेटवस्तूंचे वाटप करण्यात



येते. त्यामुळे, रोकड, दारू, भेटवस्तू आदींची मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जाते. हा प्रकार रोखण्याकरिता वाहनांची तपासणी केली जात आहे. मानखुर्द पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधु घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी चेकनाका येथे नाकाबंदी लावण्यात आली. या नाकाबंदीदरम्यान चेन्नईहून मुंबईला येणारा ट्रक पोलिसांनी शनिवारी पहाटे पोलिसांनी अडवला आणि त्याची तपासणी केली. त्यावेळी, ट्रकमध्ये साडेआठ टन वजनाची चांदी आढळून आली. इतक्या मोठ्या प्रमाणात ट्रकमध्ये चांदी आढळून आल्याने त्याची माहिती तात्काळ प्राप्तीकर विभाग व निवडणुक आयोगाच्या पथकांना देण्यात आली. तसेच, पंचनामा केल्यानंतर पुढील कारवाई करिता जप्त केलेली चांदी प्राप्तीकर विभागाकडे सुपूर्द करण्यात आली. या चांदीबाबत आवश्यक ती शहानिशा प्राप्तिकर विभाग व निवडणूक आयोगामार्फत केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## पाळीव प्राण्यांच्या विरहाच्या भीतीने नैराश्य, तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

■ **भाईंदर: विशेष प्रतिनिधी**

घरात पाळलेल्या दोन मांजरी आणि सरडा यांचा विरहाच्या भीतीने नैराश्यात गेलेल्या मिरा रोड मधील २७ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अनिस कुरेशी असे या तरुणाचे नाव आहे. त्याने पाळलेले प्राणी त्याचे कुटुंबिय घरातून बाहेर काढणार होते. त्यामुळे अनिस नैराश्यात गेला होता.

मिरा रोडच्या नया नगर येथे अनिस आपल्या कुटुंबियांसोबत रहात होता. तो एका बेकरीत काम करत होता. त्याला लहानपणापासून प्राण्यांची आवड होती. त्याने आपल्या घरात दोन मांजरी आणि ईलवाना प्रजातीचा सरडा पाळला होता. मात्र या प्राण्यांमुळे घरात अस्वच्छता व्हायची. सरडा पाळणे कुटुंबियांना आवडत नव्हते. ते सतत त्याला प्राणी पाळू नको असे सांगत होते. परंतु त्याकडे तो दुर्लक्ष करत होता. या प्राण्यांची तो काळजी घ्यायचा. मात्र त्याच्या कुटुंबियांना अनिसचा विरोध डावलून या मांजरी आणि सरड्याला घराबाहेर काढण्याचा निर्णय घेतला. आपण प्रेमाने पाळलेले प्राणी आपल्यापासून दूर जातील या भीतीने तो नैराश्यात गेला होता. याच नैराश्यातून त्याने दुपारी घरात कुणी नसताना गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात अपमृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती नया नगर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार



निखिल मोरे यांनी दिली. अनिसला लहानपणापासूनच प्राणी आणि पक्ष्यांवर प्रेम होते. लहानपणी पक्षी आणि मासे पाळले होते. सध्या त्याच्याकडे दोन मांजर आणि ईलवाना प्रजातीचा सरडा होता. त्याला आणखी प्राणी पाळायचे होते. काही महिन्यापूर्वीच त्याची बेकरीतील नोकरी सुटली होती. यावेळी आपला संपूर्ण वेळ तो या पाळीव प्राण्यांसोबत घालवत होता. तुझ्या होणाऱ्या बायकोला प्राणी आवडणार नाही, अशी भीती त्याचे कुटुंबिय घालत होते.

## डोंबिवलीत मद्य, गांजा सेवन करून रस्त्यावर गैरशिस्तीने वागणाऱ्या तीन जणांवर गुन्हे

■ **डोंबिवली: विशेष प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी मद्य, गांजा सेवन करून गैरशिस्त करण्यास प्रतिबंध असताना येथील मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत शनिवारी रात्री तीन जणांनी वेगळ्या ठिकाणी मद्य, गांजा सेवन करून सार्वजनिक ठिकाणच्या रस्त्यावर गैरशिस्त केल्याने मानपाडा पोलिसांनी या तीन जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. विधानसभा निवडणुकीचा कालावधी सुरू आहे. आदर्श आचारसंहिता सुरू आहे. कायदा आणि सुव्यव्यवस्था राखणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. अशा परिस्थितीत मानपाडा पोलिसांना गस्त घालत असताना शनिवारी तीन वेगळ्या ठिकाणी तीन जण मद्य सेवन करून, गांजाचे सेवन करून सार्वजनिक रस्त्यावर गैरशिस्त करत असल्याचे आढळून आले.

गोळवली भागात राहणारे सागर कसबे हे अंडाबुर्जी विक्रीचा व्यवसाय करतात. शनिवारी रात्री गोळवली पांडुरंवाडी भागात सागर कसबे हे मद्य सेवन करून सार्वजनिक ठिकाणी गैरशिस्त करत असल्याचे मानपाडा पोलीस ठाण्याच्या गस्तीवरील पोलिसांना आढळले. त्यांनी सागर यांच्याकडे आपल्याकडे मद्य सेवन करण्याचा परवाना आहे का, अशी विचारणा केली. त्यांनी असा परवाना नसल्याचे पोलिसांना सांगितले. मद्य सेवन करून सार्वजनिक ठिकाणी गैरशिस्त केल्याने हवालदार अशोक आहेर यांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाने सागर कसबे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल



केला. दुसऱ्या एका प्रकरणात, राजेश सरोदे हे रिक्षाचालक गोळवली भागात मद्यपान करून सार्वजनिक रस्त्यावर गैरशिस्त करत असल्याचे मानपाडा पोलिसांच्या गस्तीवरील पोलिसांना आढळले. ते सूचकनाका भीमनगर भागात राहतात. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाने हवालदार अशोक आहेर यांनी त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. अन्य एका प्रकरणात, राहुल कसबे हे शिळफाटा रस्त्यावरील टाटा पॉवर परिसरातील पिसवली भागात आडोशाला सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करत असल्याचे गस्तीवरील पोलिसांना आढळले.

## चाकू भोसकून खून करणाऱ्या आरोपीला बंडगार्डन पोलिसांनी ठोकल्या बेड्या

■ **पुणे: विशेष प्रतिनिधी**

खेड भागात वादविवादातून मित्राचा चाकू भोसकून खून केल्यानंतर फरार असणाऱ्या एका आरोपीला बंडगार्डन पोलिसांच्या तपास पथकाने जेरबंद केले आहे. ससून रुग्णालयाजवळ ही कारवाई करण्यात आली आहे. सलमान अबुलगणी शेख (वय २३, वडगाव रोड, आळंदी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याघटनेत शरद गायकवाड याचा खून झाला आहे. याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल आहे. ३ नोव्हेंबर रोजी रात्री हा प्रकार घडला होता. त्यानंतर सलमान हा पसार झालेला होता. ही कारवाई सहाय्यक आयुक्त दीपक निकम, वरिष्ठ निरीक्षक रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक धीरज गुप्ता, स्वप्निल लोहार, ज्ञाना बडे, मनोज भोकरे व त्यांच्या पथकाने केली आहे. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस



सतर्क आहेत. फरार व पाहिजे आरोपी तसेच सराईतांवर लक्ष ठेवले जात आहे. यादरम्यान, बंडगार्डन पोलीस हद्दीत गस्त घालत होते. तेव्हा ससून रुग्णालयाजवळ सकाळी साडे नऊच्या सुमारास एकजन संशयित दिसून आला. त्यामुळे त्याला पथकाने थांबवून विचारपूस केली. पण, तो घाबरला. तसेच, उत्तरे देखील उडवा-उडवीची दिली. त्यामुळे त्याच्यावर संशय बळावला. त्याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याच्याकडे सखोल तपास केल्यानंतर त्याने चाकण ते खेड दरम्यान खरपुडी फाटा येथे मित्र शरद याचा चाकू भोसकून खून केल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी याबाबत खेड पोलिसांशी संपर्क साधत, यासंदर्भात माहिती घेतली. तेव्हा खेड पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. त्याला पुढील कारवाईसाठी खेड पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

## दवाखान्यातील चिठ्ठीमुळे कुजलेल्या मृतदेहाची ओळख पटली, आठवड्याभरापूर्वी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला होता मृतदेह

■ **ठाणे: विशेष प्रतिनिधी**

कळवा येथे आठवड्यापूर्वी गळफास घेतालेल्या अवस्थेत आढळलेल्या मृतदेहाची अखेर ओळख पटली आहे. बालजी यादव (३१) असे मृताचे नाव असून आजारपणामुळे त्याने आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. तसेच त्याने महिन्याभरापूर्वी आत्महत्या केली असावी असे पोलिसांचे म्हणणे आहे. बालजी याचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत होता. तसेच त्याचा शिर गळफास घेतलेल्या अवस्थेत होते. तर धड कुजल्यामुळे झाडाच्या बुंध्याजवळ पडलेल्या अवस्थेत पोलिसांना आढळले होते.

कळवा येथील पारसिकनगर अग्निशमन दल केंद्राजवळील जॉगिंग ट्रॅक परिसरात १० नोव्हेंबरला एका व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह असल्याची माहिती कळवा पोलिसांना प्राप्त झाली होती. पोलिसांनी या मृतदेहाची पाहाणी केली असता, मृतदेहाचे शिर गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकत होते. तर त्याचे धड झाड्याच्या बुंध्याला गळून पडले होते. मृतदेहाची ओळख पटविणे पोलिसांना कठीण जात होते. दरम्यान, व्यक्तीच्या शर्टच्या कॉलरवर एका शिवणकाम करणाऱ्या व्यक्तीचे नाव छापील होते.



तसेच त्याच्या शर्टच्या खिशामध्ये मुंब्रा येथील एका दवाखान्याची चिठ्ठी होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांची काही पथके तयार करण्यात आली.

संबंधित शिवणकाम करणाऱ्या व्यक्तीच्या दोन महिन्यांची पावती पुस्तके पोलिसांनी तपासली. तसेच दवाखान्यात विचारणा केली असता, २० दिवसांपूर्वी बालगोविंद यादव नावाचा व्यक्ती भाऊ हरविला असल्याची चौकशी करण्यासाठी आला असल्याची माहिती तेथील दवाखान्यातील कर्मचाऱ्याने दिली. पोलिसांनी तात्काळ बालगोविंद याला संपर्क साधला. त्याची विचारणा केली. तसेच मृतदेहाचे कपडे आणि बुट दाखविण्यात आले. हे कपडे आणि बुट त्याचा भाऊ बालजी यादव याचे असल्याचे त्याने स्पष्ट केले. तसेच तो हरविल्याप्रकरणी शिळ डायघर पोलीस ठाण्यात तक्रार देखील दाखल होती. मृताच्या कुटुंबियांची पोलिसांनी चौकशी केली असता, तो आजारी असल्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले. तसेच बालजी याने महिन्याभरापूर्वी आत्महत्या केली असावी असा अंदाज देखील पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## ऐन निवडणुकीच्या धामधूमीत पुणे पोलिसांनी आतापर्यंत तब्बल 'इतक्या' तडीपार गुंडांना पकडले

■ **पुणे : विशेष प्रतिनिधी**

निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष तसेच उमेदवारांकडून गुंडाचा वापर केला जात असल्याचा आरोप होत असतानाच पुण्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून जवळपास ४० तडीपार गुंडांना पुणे पोलिसांनी पकडले आहे. त्यात पुण्यात ऐन निवडणुकीच्या काळात अन् प्रचाराच्या धामधुमीत हे तडीपार गुंड शहरात हजेरी लावत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या आरोपींमध्ये तथ्य असल्याचे दिसते. राज्यभरात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. प्रचार शिगेला पोहचला आहे. आरोपी-प्रत्यारोप होत आहेत. हे सुरू असतानाच राजकीय पक्ष तसेच उमेदवार गुंडांचा वापर करत असल्याचाही आरोप होत आहे. दरम्यान निवडणूकीत शहरात कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे पोलिसांकडून सतर्कता बाळगत काम केले जात आहे. त्यामध्ये बेकायदा हत्यारे बाळगणाऱ्या गुंडांसह तडीपार गुंडावर नजर ठेवली जात असून, त्यांना चाप लावण्यात येत आहे. राज्यात १५ ऑक्टोबर रोजी आचारसंहिता लागू झाली. तेव्हापासून पुणे पोलीस या गुन्हेगारांविरोधात कडक पावले उचलत आहेत. यादरम्यान, १५ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर या कालावधीत एकूण ४० तडीपार गुंडांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये काही गुंडांकडे बेकायदा हत्यारे देखील सापडली आहेत. चालू वर्षात जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण शहरात २१४ तडीपार गुंडांना अटक करण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत दर महिन्याला सरासरी वीस तडीपार गुन्हेगार शहरात आढळून आले होते.



मात्र गेल्या महिन्याभरात ही संख्या दुपटीने वाढल्याचे दिसते. अचानक निवडणूकीच्या काळातच हे गुंड शहरात हजेरी लावत असल्याने वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळेच निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून गुन्हेगारांचा वापर केला जात असल्याचा आरोप प्रत्यारोपाला तथ्य असल्याची शंका येते. पुणे शहरातील अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिलेले असताना धनकवडी भागात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेने छापा टाकून पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी येथून तब्बल दहा जणांना पकडले असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तर, २२ हजार रुपयांची रोकड व मोबाइल जप्त केले आहे. हद्दीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर जुगार अड्डा सुरू असताना सहकारनगर पोलिसांचा त्याकडे कानाडोळा असल्याचे दिसून येत आहे.

आचारसंहिता काळातील कारवाई

परिमंडळ एक – ३
परिमंडळ दोन – ८
परिमंडळ तीन – ९
परिमंडळ चार – ४
परिमंडळ पाच – १६

# धारावी प्रकल्प रद्द करणार! काँग्रेसचा 'मुंबईनामा' जाहीर

**मुंबई : राकेश गायकवाड**

महाविकास आघाडीच्या संयुक्त जाहीरनाम्यापाठोपाठ मुंबईकरांसाठी काँग्रेसकडून 'मुंबईनामा' घोषित करण्यात आला आहे. काँग्रेसने धारावी पुनर्विकासाचे आश्वासन देतानाच अदानींना देण्यात आलेले कंत्राट मात्र रद्द करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. मच्छीमारांना पाच लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात येईल आणि गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुका महाविकास आघाडी सरकार तीन महिन्यांत घेईल, असे आश्वासन काँग्रेसकडून देण्यात आले आहे. धारावी पुनर्विकासात ५०० चौरस फुटांचे घर आणि ज्यांच्या उद्योग व व्यावसायिक जागा आहेत, त्यांनाही पुनर्विकासात जागा देण्यात येईल. या उद्योगांमधील मालाची निर्यात करण्यासाठी विशेष केंद्र निर्माण केले जाईल. मुंबई महानगर क्षेत्रात ५० हजारांहून अधिक इमारतींकडे भोगवटा प्रमाणपत्र नसून ते सहा महिन्यांत देण्यात येईल. मुंबई काँग्रेस अध्यक्षा आमदार वर्षा गायकवाड यांच्यासह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयी गौरवोद्गार काढावेत, अशी टिप्पणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवाजी पार्क येथील सभेत



केली होती. त्यानंतर लगेच काँग्रेसच्या 'मुंबईनामा'वर बाळासाहेब ठाकरे यांचे इतरांपेक्षा मोठे छायाचित्र छापण्यात आले आहे. पत्रकार परिषदेच्या फलकावरही बाळासाहेबांचे मोठे छायाचित्र लावण्यात आले होते. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी व प्रियंका गांधी यांचे छायाचित्र वापरण्यात आलेले नाही.

**जाहीरनाम्यातील आश्वासने**

- **विधानसभेच्या पहिल्याच अधिवेशनात गृहनिर्माण सोसायट्यांवरील १८ टक्के जीएसटी कमी करून ५ टक्के करणार**
- **भूमिपुत्रांना नोकऱ्यांत प्राधान्य**
- **झोपडपट्टी व मुलींच्या शाळांमध्ये एक रुपयात सॅनिटरी नॅपकीन**
- **महिलांसाठी सुरक्षित व परवडणारी वसतिगृहे**
- **मुंबईत हाताने होणारी साफसफाई थांबवून स्वयंचलित ड्रेन सफाई तंत्रज्ञान व कौशल्य विकास केंद्र स्थापणार**
- **बुद्ध विहारांना निधी देणार**
- **मुंबईतील ससून व माझगाव बंदरासह वरळी व वांद्रे येथे मत्स्य उत्पादन विपणन परिषदेची स्थापना**
- **कोळीवाड्यातील गावठाण क्षेत्रांचा विकास**
- **मुंबई पूर्व व पश्चिम उपनगरात सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारणार**

# रिझर्व बँकेला 'लश्कर-ए-तैयबा'च्या नावाने धमकी, कशी आणि कोणती धमकी दिली...

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

रिझर्व बँक ऑफ इंडियाला एक धमकीचा दूरध्वनी आला असून हा दूरध्वनी रिझर्व बँकेच्या ग्राहक महत क्रमांकावर आला होता. फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने स्वतःला 'लश्कर – ए – तैयब'चा विशेष कार्यकारी अधिकारी



असल्याचा दावा केला. हा दूरध्वनी शनिवार सकाळी सुमारे १० च्या आला होता. फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने आपण लश्कर-ए-तैयबचा सीईओ आहे, बँक बंद करा. मोटरगाडी धडक देणार आहे , अशीही धमकी दिली. घटनेचे गंभीर्य लक्षात घेऊन रिझर्व बँकेच्या सुरक्षा रक्षकाने माता रामाबाई मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, हा एक खोडसाळपणा असल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. यावर्षी विमानतळावर अनेक धमक्याचे संदेश आले होते. त्याप्रकारणी २० गुन्हे दाखल आहेत. गेल्यावर्षीही अफवांचे सुमारे १०० दूरध्वनी मुंबई पोलिसांना आले होते. यावर्षी जुलै महिन्यापर्यंत ३५ दूरध्वनी मुंबई पोलिसांना प्राप्त झाले आहेत. उद्योगपती मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी यांच्या विवाह सोहळयात बॉम्ब असल्याचे ट्वीट करणाऱ्याला नुकतीच मुंबई पोलिसांनी गुजरातमधून अटक केली. हे ट्वीट १३ जुलै रोजी करण्यात आले होते. दरम्यान, सुरक्षेबाबत योग्य ती काळजी घेण्यात आली होती. याप्रकरणी विरल आसरा या तरूणाला अटक करण्यात आली होती. तो खासगी कंपनीत कामाला आहे. आरोपी आयटी इंजिनीयर होता. तर एका व्यक्तीने १३ मे रोजी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षात दूरध्वनी करून असलम अली कराची पाकिस्तानमधून ३५० किलो आरडीएक्स घेऊन मुंबईत आला आहे. तो महालसूक्ष्मी, विमानतळ आणि इतर रेल्वे स्थानाकांवर आरडीएक्स ठेवणार असल्याचे दूरध्वनी करणाऱ्याने सांगितले.

# उरणच्या उमेदवारांना क्रीडांगण सुविधांचा विसर, मतदारसंघात खेळाच्या मैदानांचा अभाव

**उरण : विशाल कारंडे**

विकसनशील व राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या नजीकच्या विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत एकाही उमेदवाराने संकल्प



पत्रात उरण मतदारसंघातील खेळांची मैदाने तसेच क्रीडाविषयक अन्य सुविधांचा उल्लेखही केलेला नाही. या महत्त्वाच्या व आवश्यक सुविधेकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाले आहे. एक विकसनशील मतदारसंघ म्हणून परिचित असलेल्या या मतदारसंघात खेळाच्या मैदानाचा अभाव आहे. या संदर्भात खेळाडू आणि खेळप्रेमींकडून खेद व्यक्त केला जात आहे. सध्या खेळाच्या माध्यमातूनच अनेकांचे भविष्य घडले आहे. आपल्या पाल्याने खेळात करिअर करावे यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी अनेक कष्ट घेतले जात आहेत. उरण मतदारसंघातही हीच स्थिती आहे. येथील विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना मुंबई किंवा नवी मुंबईत जावे लागत आहे. अनेकांना लांबवरचा प्रवास करून खेळाचा सराव करावा लागत आहे. त्यासाठी वेळ, पैसा खर्च होत आहे.

मतदारसंघातील उरण, पनवेल आणि खालापूर तालुक्यांतील अनेक प्रकारच्या खेळात राष्ट्रीय व राज्य पातळीवर खेळाडूंनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अनेकांनी तर परदेशात जाऊन या मतदारसंघाचे नाव मोठे केले आहे. मात्र या मतदारसंघात सर्वसामान्य खेळाडूंना सराव करता येईल किंवा खेळ खेळता येईल असे एकही मैदान नाही. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंना मिळेल क्रीडा प्रकारांचा सराव हा सरावास अयोग्य असलेल्या परिसरात आपला सराव करावा लागत आहे. यात महिला खेळाडूंना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

# उरण-करंजा मार्गाची दुरवस्था कायम

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आणि देशातील मोठ्या मच्छीमार बंदराला जोडणाऱ्या उरण ते करंजा मार्गाची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणारे हजारो नागरिक त्रस्त झाले आहेत. या मार्गाचे दुरुस्ती आणि रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून ते लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहे. उरण शहर ते करंजा हा चार किलोमीटर



लांबीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून उरण ते अलिबाग हा जलमार्ग आहे. तर नव्याने निर्माण झालेल्या करंजा मच्छीमार बंदरात दररोज अनेक वाहने वाहतूक करीत आहेत. मात्र मार्गाच्या मधोमध रस्ता खोदण्यात आला आहे. रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी खडी टाकल्याने वाहने त्यात फसून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. अशा प्रकारचा अपघात झाल्याने एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या मार्गावरील खड्ड्यांमुळे धुळीचाही त्रास सहन करावा लागत आहे. उरण ते करंजा हा मार्ग जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. मात्र त्याच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आले आहे. चार किलोमीटर लांबीच्या या मार्गाच्या रुंदीकरण आणि दुरुस्तीसाठी चार कोटींचा निधी मंजूर झाला असून त्याचे काम सुरू आहे, अशी माहिती सा. बां. विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली.

# कार्यकर्त्यांचा अतिउत्साह उमेदवाराच्या अंगलट आला; फटाक्यांच्या ठिणगीमुळे उमेदवाराचे केस जळाले

**मुंबई : सम्यक कासारे**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. त्यामुळे प्रत्येक उमेदवार आपापल्या प्रचारावर भर देत आहे. कार्यकर्त्यांचा उत्साहही शिगेला पोहोचला आहे. पण काही ठिकाणी कार्यकर्त्यांचा उत्साह हा नेत्यांच्या अंगलट येताना दिसत आहे. कल्याण पश्चिम विधानसभेतील जिजाऊ विकास पार्टीचे उमेदवार राकेश मुथा यांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह त्यांच्या जीवावर बेतला. या घटनेचा व्हिडीओ आता व्हायरल होत आहे. या दुर्घटनेतून राकेश मुथा थोडक्यात बचावले असले तरी सदर दुर्घटनेचे गंभीर परिणाम होऊ शकले असते. राकेश मुथा रविवारी रात्री उशिरा प्रचार करत असताना भोईरवाडी परिसरात त्यांच्या स्वागतासाठी दीडशे किलो वजनाचा भव्य हार तयार करण्यात आला होता. हा हार क्रेनच्या साहाय्याने त्यांच्या गळयात टाकण्यात आला. मात्र, हारासोबत लावलेल्या इलेक्ट्रिक स्पार्कर्स फटाक्यांची ठिणगी उडाली आणि ती मुथा यांच्या डोक्याला लागली. या





कारणाने त्यांच्या केसांनी पेट घेतला. मात्र, उपस्थित कार्यकर्त्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून आग विझवली. यानंतरही राकेश मुथा कार्यकर्त्यांच्या गराड्यात राहिले. त्यांच्या हावभावामुळे त्यांना अधिक दुखापत झालेली नसल्याचे दिसून आले. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी उमेदवारांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांचा अतिरेकी उत्साह हा धोका निर्माण करू शकतो, हेच या घटनेवरून दिसून आले. दरम्यान दोन दिवसांपूर्वीच राकेश मुथा यांचे बॅनर फाडल्यामुळे तणाव निर्माण झाला होता. महापालिका अधिकारी जाणूनबुजून बॅनर फाडत असल्याचा आरोप करून मुथा यांनी निषेध आंदोलन करत दोन तास ठिय्या दिला होता. गेल्या काही दिवसांपासून राकेश मुथा यांचे बॅनर वारंवार फाडले जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

# राज ठाकरेंची उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका, 'गद्दार घरात बसला आहे, शिवसेना..'

**मुंबई : गणेश बागडे**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक २० तारखेला पार पडणार आहे. आज प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. या दिवशी राज ठाकरेंनी शिवडी या ठिकाणी सभा घेतली. या सभेत त्यांनी उद्धव ठाकरेंचा उल्लेख खाष्ट सासू असा केला आहे. तसंच शिवसेनेचा खरा गद्दार तर घरात बसला आहे असं म्हणत टोलाही लगावला आहे. निवडणूक प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस आहे. राज ठाकरेंनी शिवडी या ठिकाणी बाळा नांदगावकरांसाठी सभा घेतली. या सभेत त्यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली आहे. 'विधानसभा निवडणुकीसाठी मी ही शेवटची सभा घेतली आहे. ही सभा बाळा नांदगावकरसाठी आहे. येत्या २० तारखेला रेल्वे इंजिन या निशाणीवर बटण दाबून बाळा नांदगावकर यांना निवडून द्या.' असं आवाहन राज ठाकरेंनी केलं आहे. 'बाळा नांदगावकरांना शिवसेना आणि भाजपाने जो पाठिंबा दिला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. खरंतर बऱ्याच मतदारसंघात आभार मानता आले असते पण जाऊ दे तो विषय. महाराष्ट्रात अनेक विषय खोळंबलेले आहेत.



आपल्याला त्या गोष्टी माहीत आहेत. महाराष्ट्रात सध्या खूप वाईट परिस्थिती आहे. हिंदुत्वाने भारवलेला हा महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्राला जातीपातींमध्ये तोडण्याचं काम शरद पवारांनी केलं आहे. राष्ट्रवादीच्या जन्मानंतर हे सगळं सुरु झालं. आपल्या संतांनी दिलेल्या एकोप्याची शिकवण आपण विसरलो आहे यांचं स्वार्थी राजकारण त्याला जबाबदार आहे.' अशी टीका राज ठाकरेंनी केली. मुख्यमंत्री व्हायचं, ती माळ गळयात घालायची म्हणून शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसबरोबर जाऊन बसली. हे कुठलं राजकारण आहे? मी देशाच्या राजकारणात आजवर अशी गोष्टच पाहिलेली नाही. ज्यांच्या विरोधात निवडणूक लढवली, निकाल आल्यावर त्यांच्या बरोबर जाऊन बसले. जातीयवाद भडकवून हे तुम्हाला विसरायला लावत आहेत. असाही आरोप राज ठाकरेंनी केला.

**उद्धव ठाकरे राज ठाकरेला आडवा येतोच कसा?**

मी मशिदींवरचे भोंगे खाली आणायला सांगितले होते. ते खाली आले सुद्धा. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना हा निर्णय घेतला गेला. त्यांच्या सरकारने १७ हजार मनसैनिकांवर केसेस टाकल्या. कारण काय? तर ते सगळे हनुमान चालीसा म्हणणार होते म्हणून. मला आठवतंय बाळासाहेबांनी त्यांच्या एका भाषणात सांगितलं होतं की मशिदींवरचे भोंगे खाली आले पाहिजेत. ती गोष्ट राज ठाकरे करुन दाखवत असेल तर उद्धव ठाकरे आडवा येतोच कसा? असा प्रश्न राज ठाकरेंनी विचारला आहे. 'काँग्रेसच्या राहुल गांधीला अक्कल नाही, काँग्रेस स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करते. वर्षा गायकवाड राहुल गांधींना शिवछत्रपतींची प्रतिमा देत होत्या त्यांनी त्याकडे बघितलं आणि तोंड फिरवलं. महाराजांची प्रतिमा ज्या माणसाला घ्यायला लाज वाटते त्यांच्याबरोबर जाऊन हे (उद्धव ठाकरे) बसले आहेत. का बसले? स्वतःचा स्वाथ.' असं राज ठाकरे म्हणाले.

एका माणसाने सगळ्या पक्षाची वाट लावली. अनेक लोक निघून गेले, त्यांना हे म्हणतात गद्दार आहेत. गद्दार तर घरात तिथे बसला आहे, ज्याने पक्षाशी गद्दारी केली. एक उदाहरण देतो. एक कुटुंब असतं त्यात तीन मुलं असतात. पहिल्या मुलाचं लग्न होतं सून घरात येते. सासूबाईशी भांडण सुरु होतं.


त्यामुळे तो मुलगा म्हणतो जाऊदेत आपण वेगळं होऊ. मग ते दोघं वेगळे होतात. लोक म्हणतात आज कालच्या मुली घरात आल्या की नीट बोलायला नको, काही करायला नको, आता वेगळे झाले आहेत. दुसऱ्या मुलाचं लग्न होतं सून घरात येते, सासूबाईशी भांडण सुरु होतं. वाद सुरु होतात. दुसरा मुलगाही घर सोडून जातं. तिसरी सून येते. तिसऱ्या सुनेचंही सासूशी भांडण होतं.

# शिक्षण संस्थेच्या नावाखाली औद्योगिक भूखंडावर डोळा, मंत्री अब्दुल सत्तार यांच्या खेळीस अधिकाऱ्यांच्या सजगतेमुळे चाप

**छत्रपती संभाजीनगर / ठाणे : तृप्ती गोरे**

छत्रपती संभाजीनगर शहरातील चिकलठाणा आणि वाळुज या दोन औद्योगिक वसाहतींमधील ३४ व ३५ हजार चौरस मीटरचे दोन भूखंड नॅशनल एज्युकेशन संस्थेस द्यावेत, याविषयी अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी सादर केलेला प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी फेटाळून लावला आहे.

१० नोव्हेंबर रोजी झालेल्या या बैठकीच्या इतिवृत्तानुसार हा प्रस्ताव नियमबाहय असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या निमित्ताने, औद्योगिक वसाहतीमधील जागांवर सत्तार यांनी डोळा ठेवून हालचाली केल्याची कागदपत्रे समोर आली आहेत. विविध ठिकाणच्या जमीन प्रकरणांत अधिकार कक्षा ओलांडून हस्तक्षेप केल्याप्रकरणात सत्तार यांना न्यायालयात माफी मागावी लागली होती. तसेच दिलावर बेग या एकाच तक्रारदार व्यक्तीच्या जमिनीविषयक तक्रारींची सत्तार दखल घेतात, अशी टिप्पणी न्यायालयाने केली होती. बेग यांनी केलेल्या तक्रारी किती याची माहितीही महसूल विभागास मागितली होती. वाशिम येथील १५० कोटीचे बाजारमूल्य असणारी गायरान जमीन विक्री करण्याच्या निर्णयावरून तर विधिमंडळात



गोंधळ झाला होता.

शहरातील भूखंडावर अतिक्रमण करणे, जमिनी बळकावणे असे आरोप विधानसभा निवडणूक प्रचारात भाजपचे नेते रावसाहेब दानवे आणि शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी जाहीर सभांमधूनही केले होते. नॅशनल एज्युकेशन सोसायटी या सत्तार यांच्या संस्थेने चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमध्ये क्र. २०, १०, ४७, ४४ , २२ व ५२ मधील खुली अशी एकत्रित ३५ हजार चौरस मीटर जागा क्रीडांगणासाठी आणि वाळुज औद्योगिक क्षेत्रातील ४७ / २, ४१, ४२ व ४५ मधून ३५ हजार चौरस मीटर जागा शैक्षणिक प्रयोजनासाठी मागितली होती. क्रीडांगणासाठी औद्योगिक वसाहतीत मोकळया जागेचा दर नाममात्र एक रुपया असतो. मात्र, अशा प्रकारे क्रीडांगणास जागा देताना केंद्र किंवा राज्य सरकारच्या मान्यताप्राप्त संस्थांशी संबंधित संस्थेचे संलग्नीकरण आवश्यक असते. तो निकष सत्तार यांच्या संस्थेकडे नव्हता. अन्यथा प्रचलित दराच्या पाच टक्के दराने ही जागा त्यांना मिळू शकली असती. चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमध्ये धोरणाप्रमाणे खुली जागा देता येणार नाही, असा अभिप्राय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) संचालक मंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला.

# गावी जाणाऱ्या मतदारांना रोखण्याचे मोठे आव्हान; ऐरोली, बेलापूरमध्ये उमेदवारांची कसरत

**नवी मुंबई : धनश्री सट्टा**

बेलापूर व ऐरोली या दोन्ही मतदारसंघांत यंदा अत्यंत चुरशीच्या लढती होणार असून यंदा मोठ्या पक्ष बदलाच्या घडामोडी घडल्या आहेत. त्यामुळे निवडणुकांना अधिक रंगत आली असून मतदानाच्या दिवशी आपल्या मूळ गावच्या मतदारसंघात जाणाऱ्या मतदारांना रोखण्याचे अवघड काम नवी मुंबईतील उमेदवारांना करावे लागणार असल्याचे चित्र आहे.

दोन्ही मतदारसंघांत माथाडी कामगारांची मतदारसंख्या मोठी आहे. बेलापूर ते ऐरोली -दिघापर्यंत माथाडी कामगार मोठ्या प्रमाणात राहत असून माथाडी मतदार हे मतदानासाठी आपल्या मूळ गावी जातात. यंदाच्या निवडणुकीतही माथाडींचे नेते व माथाडींशी संपर्कात असलेले पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नेते निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अनेकांनी निवडणुका जाहीर होण्याच्या आधीच नवी मुंबईत आपल्या मूळ गावच्या मतदारसंघातील मतदारांचे मेळावे नवी मुंबईत घेतले होते. २० तारखेला होणाऱ्या मतदानासाठी मूळ गावी जाण्यासाठी उमेदवारांनी वाहनांचीही सोय केली आहे. त्यामुळे आता नवी मुंबईत माथाडी मतदारांना थांबवण्यासाठी नवी मुंबईतील उमेदवारांना मोठी कसरत करावी लागणार आहे.

नेरुळ, सानपाडा, तुर्भे, वाशी, कोपरखैरणे, घणसोली ते अगदी ऐरोलीपर्यंतच्या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात माथाडी कामगार राहतात. या माथाडी कामगारांची नाळ आपल्या मूळ गावाशी व तेथील आमदारांशी जोडलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात माथाडी कामगारांशी जवळील असलेले माथाडींचे नेते शशिकांत शिंदे हे कोरेगाव, मकरंद पाटील हे वाई-खंडाळा-महाबळेश्वर, संग्राम पाटील हे भोर, शंभुराजे देसाई हे पाटण, शिवेंद्र राजे भोसले हे सातारा, तर



पृथ्वीराज चव्हाण हे कराड मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे या मतदारसंघातील आपले मूळ मतदार हे गावी मतदानाला आणण्यासाठी जवळजवळ या सर्वच उमेदवारांनी वाहनांची सोय केली आहे. त्यामुळे नवी मुंबईतील बेलापूर व ऐरोली मतदारसंघांतून मूळ गावी मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना रोखण्याचे काम दोन्ही मतदारसंघांतील उमेदवार कसे करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदाची निवडणूक ही मोठ्या फरकाने नाही तर अत्यंत कमी मताच्या फरकाने निवडणुकीचे निकाल पाहायला मिळणार आहेत. त्यामुळे गावी मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना रोखणे मोठे आव्हान ठरणार आहे.

नवी मुंबईत राहणाऱ्या माथाडी कामगारांची नाळ ही आपल्या मूळ गावाशी व आमदारांशी जोडली गेली आहे. त्यामुळे ते मतदानासाठी गावी जाणार हे निश्चित आहे. वाशी, कोपरखैरणे, घणसोली विभागांत माथाडी कामगारांची संख्या खूप मोठी आहे. माथाडी कामगारांशी जवळचा संपर्क असलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते आमदारकीला उभे आहेत. त्यामुळे माथाडी कामगार मतदानासाठी गावी जाणार हे निश्चित मानले जात आहे.